नॅशनल सेक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड

# NSDL

# डिमॅट खातेधारकांसाठी

# ई-गाईड

## अनुक्रमणिका


प्रस्तावना ........................................................ 4

सामान्य माहितीपासून सुरुवात करुया ........................................................ 5

कॅपिटल मार्केट म्हणजे काय? ........................................................ 5

सेक्युरिटीज म्हणजे काय? ........................................................ 6

सेक्युरिटीजचे प्रायमरी आणि सेकंडरी मार्केट म्हणजे काय? ........................................................ 6

कॅपिटल मार्केटमध्ये सेबीची भूमिका काय असते? ........................................................ 7

कॅपिटल मार्केटमध्ये एनएसडीएलची भूमिका काय आहे? ........................................................ 7

डिमॅट जाणून घेणे ........................................................ 9

‘डिमॅट’ चा अर्थ काय? ........................................................ 9

डिपॉझिटरी म्हणजे काय? ........................................................ 9

डिपॉझिटरी खाते काय असते? ........................................................ 9

डिपॉझिटरी पार्टिसिपंट कोण असतो? ........................................................ 10

डिमॅट खाते असण्याचे काय फायदे आहेत? ........................................................ 10

एनएसडीएलद्वारे पुरविल्या जाणाऱ्या सेवा ........................................................ 12

डिमॅट खाते उघडणे ........................................................ 12

बेसिक सर्विसेस् डिमॅट खाते (BSDA)........................................................ 19

सेक्युरिटीजचे डिमटेरियलायझेशन ........................................................ 21

सेक्युरिटीजचे रिमटेरियलायझेशन ........................................................ 28

मार्केट ट्रेड आणि सेक्युरिटीज हस्तांतरण पूर्ण करणे ........................................................ 29

सेक्युरिटीजचा संचार (ट्रांसमिशन) .................................................................... 36

नामांकन .................................................................................................. 41

सेक्युरिटीज प्लेजिंग आणि हायपोथीकेशन ........................................................ 44

सेक्युरिटीज उधार देणे आणि उधार घेणे .............................................................49

डिमॅट खात्यासाठी पॉवर ऑफ ॲटर्नीचा वापर .....................................................51

एनएसडीएलच्या ई-सेवा ................................................................................ 54

स्पीड-ई ................................................................................................... 54

आयडियाज ............................................................................................... 56

एनएसडीएल मोबाईल ॲप .............................................................................. 56

ई-वोटिंग .................................................................................................. 56

एनएसडीएलच्या इतर उपयुक्त सेवा ................................................................... 57

एनएसडीएल कंसॉलिडेटेड अकाउंट स्टेटमेंट ..................................................... 57

एसएमएस ॲलर्ट सुविधा ................................................................................ 58

डिमॅट खात्यात म्यूचुअल फंड युनिट्स ............................................................... 61

डिमॅट खात्यात अपडेट/ बदल करणे ................................................................. 64

डिमॅट खात्यातील कॉर्पोरेट लाभ ..................................................................... 68

एनएसडीएल सेवांसाठी शुल्क .......................................................................... 70

तुमच्या डिमॅट खात्याची काळजी घेणे ............................................................... 71

अधिक माहिती ............................................................................................ 76

न मिळालेल्या डीवीडंड/ शेअर्सच्या रिफंडचा दावा करणे ........................................ 76

सेक्युरिटीज हस्तांतरणासाठी अनिवार्य डिमॅट ..................................................... 78

इंवेस्टर अवेयरनेस प्रोग्राम (गुंतवणूकदार जागरुकता कार्यक्रम) ................................ 79

गुंतवणूकदारांसाठी एनएसडीएल न्यूजलेटर ........................................................ 79

तक्रार निवारण ......................................................................................... 80

इतर गुंतवणूकदार केंद्रित सेवा .................................................................... 80

नॅशनल स्किल्स रजिस्ट्री (एनएसआर) ........................................................... 80

केवायसी रजिस्ट्रेशन एजन्सी (केआरए) ........................................................ 81

नॅशनल अॅकेडमिक डिपॉझिटरी (एनएडी) ...................................................... 81

एनआयआर खाते (ई-इन्शुरन्स अकाऊंट) ...................................................... 81

एनएसडीएलशी संपर्क साधा ......................................................................... 82

उपयुक्त लिंक्स ........................................................................................... 85

वापरलेले संक्षेप (अॅब्रीवीएशंस) ..................................................................... 86

**प्रस्तावना**

प्रिय वाचक,

एनएसडीएलमधील तुमच्या अभिरुचीबद्दल आम्ही ‘तुमचे आभारी आहोत’.

एनएसडीएल जी भारतातील पहिली व मुख्य डिपॉझिटरी आहे, तिने आपले काम नोव्हेंबर 1996 मध्ये सुरु केले. तेव्हापासून, एनएसडीएल डिपॉझिटरी प्रणालीच्या वापरकर्त्यांमध्ये सतत वाढ होते आहे. एनएसडीएल डिपॉझिटरी प्रणालीच्या वर्तमान आणि संभावित वापरकर्त्यांना एनएसडीएल डिपॉझिटरी प्रणालीचा वापर तसेच उपलब्ध सुविधा आणि फायद्यांची माहिती देण्याचा आणि खबरदाऱ्यांविषयी जागरूक करण्याचा आमचा पूर्ण प्रयत्न आहे.

एनएसडीएलमध्ये, आम्ही असे मानतो की प्रत्येक भारतीय केवळ गुंतवणूकदार नाही, तर ‘दूरदर्शी गुंतवणूकदार’ असावा. ही पुस्तिका वाचण्याच्या तुमच्या निर्णयाला आम्ही प्रोत्साहन देतो. या पुस्तिकेतील माहितीमुळे तुम्ही ‘दूरदर्शी गुंतवणूकदार’ बनण्याच्या दिशेने पाउल उचलण्यास समर्थ व्हाल.


एनएसडीएलविषयी माहिती व्यतिरिक्त, आम्ही अनेक सेवांबद्दल माहिती दिली आहे, ज्यांचा अनुभव तुम्ही एनएसडीएल डिमॅट खाते उघडल्यानंतर घेऊ शकाल. तुम्हाला आणखी माहिती किंवा काही स्पष्टीकरण हवे असल्यास, नि:संकोचपणे आमच्याशी संपर्क साधा. अधिक सुधारणा करण्यासाठी आम्ही तुमच्या सूचनांची आणि प्रतिक्रियांची अपेक्षा करतो.

आपली,
एनएसडीएल टीम

## सामान्य माहितीपासून सुरुवात करुया

### कॅपिटल मार्केट म्हणजे काय?

साध्या आणि सोप्या शब्दांमध्ये, कॅपिटल मार्केट म्हणजे कॅपिटल किंवा फंड यासाठी असलेले मार्केट, ज्यात आपल्या व्यवसायासाठी पैशांची गरज असलेले लोक अशा लोकांना शोधतात जे पैसे पुरविण्यास इच्छुक असतात. दुसऱ्या शब्दांमध्ये, कॅपिटल मार्केट म्हणजे असे स्थान जेथे लोक विभिन्न प्रकारच्या आर्थिक साधनांची खरेदी आणि विक्री करतात. यामध्ये नियामक (सेबी), स्टॉक एक्स्चेंजेस (एनएसई/ बीएसई इ.), डिपॉझिटरीज (एनएसडीएल/ सीडीएसएल) आणि इतर मध्यस्थ माध्यमे जसे स्टॉकब्रोकर्स, डीपीज, कस्टडियन्स, आरटीएज, मर्चंट बँका इत्यादी समाविष्ट आहेत. भारतातील कॅपिटल मार्केटची व्यापक संरचना आकृती क्रमांक 1 मध्ये दिलेली आहे.




**आकृती 1**

## सेक्युरिटीज म्हणजे काय?

सेक्युरिटीज म्हणजे विविध प्रकारची आर्थिक साधने असतात, ज्यांची कॅपिटल मार्केटमध्ये खरेदी-विक्री होते. दुसऱ्या शब्दांमध्ये, ही अशी साधने असतात, ज्यांच्याद्वारे निधी पुरविणाऱ्यांद्वारे निधीची गरज असणाऱ्यांना निधी पुरविला जातो. हे समजून घेण्यासाठी एक उदाहरण घेऊ. श्री. अ हे एबीसी लिमिटेडचे एक सुप्रसिद्ध उद्योजक आणि व्यवस्थापकीय संचालक आहेत. त्यांना एबीसी लिमिटेड या नावाने एक नवीन सिमेंट कारखाना सुरु करायचा आहे. यासाठी त्यांना फार मोठ्या रकमेची (कॅपिटलची) आवश्यकता आहे, ज्यासाठी ते स्वतः किंवा एबीसी लिमिटेड पैसे उभे करू शकत नाहीत. त्यामुळे, ते कॅपिटल मार्केटमध्ये येऊन निधीच्या मोबदल्यात त्यांच्या कंपनीचे शेअर्स देऊ करण्याचा निर्णय घेतात. ते इनिशियल पब्लिक ऑफर किंवा आयपीओच्या माध्यमाने प्रवेश करतात (इनिशियल कारण एबीसी लिमिटेड पहिल्यांदाच मोठ्या प्रमाणात जनतेकडून निधी उभारत आहे). स्वीकृत किमतीचा भरणा करून जनता शेअर्ससाठी आवेदन करू शकते. योग्य ती प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर, कंपनीला त्यांच्या खात्यात पैसे मिळतात आणि आवेदकांना शेअर्स जारी करून कंपनीचे शेअरहोल्डर्स बनवले जाते.

शेअर म्हणजे वर नमूद केल्याप्रमाणे एक प्रकारची सेक्युरिटी असते. इतर उदाहरणे म्हणजे - डिबेंचर्स, बॉडस्, म्युच्युअल फंड युनिट्स, कमर्शिअल पेपर्स, ठेवी प्रमाणपत्रे, गव्हर्नमेंट सेक्युरिटीज इत्यादी.

## सेक्युरिटीजचे प्रायमरी आणि सेकंडरी मार्केट म्हणजे काय?

इश्युअर्स द्वारा जनतेस शेअर्स किंवा सेक्युरिटीज जारी करण्याला 'प्रायमरी मार्केट' असे म्हणतात. स्टॉक एक्स्चेंज, असे मार्केट असते जेथे आधीच जारी केलेल्या सेक्युरिटीजचे ट्रेडिंग (खरेदी आणि विक्री) होते, त्याला 'सेकंडरी मार्केट' असे म्हणतात. कोणताही शेअरहोल्डर एखाद्या सेबी नोंदणीकृत स्टॉकब्रोकरकडून बीएसई किंवा एनएसई सारख्या स्टॉक एक्स्चेंजेसद्वारा पुरविलेल्या मंचावर आपले शेअर्स विकण्याचा प्रस्ताव करू शकतात.

कोणतीही व्यक्ती शेअर्सची तत्कालिक किंमत देऊन आपल्या स्टॉकब्रोकरद्वारा हे शेअर्स खरेदी करू शकते.


## कॅपिटल मार्केटमध्ये सेबीची भूमिका काय असते?

सेबी किंवा सेक्युरिटीज अँड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया भारतातील भांडवल बाजारांसाठी असलेली एक नियामक संस्था आहे. याची स्थापना 1988 मध्ये एक गैर-सांविधिक संस्था म्हणून झाली होती. नंतर, 1992 मध्ये सेक्युरिटीज अँड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया अ‍ॅक्ट, 1992 पारित झाल्यानंतर ती वैधानिक अधिकार असलेली स्वायत्त संस्था झाली जी सेक्युरिटीज मधील गुंतवणूकदारांच्या हिताच्या रक्षणासाठी आणि सेक्युरिटीज बाजाराच्या विकासाच्या समर्थन आणि नियमन करणारी संस्था बनली. सेबीला व्यापक अधिकार असून ते कॅपिटल मार्केटमध्ये विविध मध्यस्थांच्या नोंदणी करून, त्या सर्व मध्यस्थांच्या नियमनाचे निरंतर निरीक्षण करू शकतात आणि नियमांचे उल्लंघन केल्यास कोणत्याही बाजार मध्यस्थाला दंड सुद्धा करू शकतात.

## कॅपिटल मार्केटमध्ये एनएसडीएलची भूमिका काय आहे?

1996 मध्ये प्रस्थापित एनएसडीएल आज जगातील एक सर्वात मोठी डिपॉझिटरी आहे. एक डिपॉझिटरी म्हणून, ती शेअर्स आणि सेक्युरिटीजच्या इतर प्रकारांना इलेक्ट्रॉनिक स्वरुपात म्हणजेच, डिमटेरियलाईझ स्वरुपात ठेवण्यात सक्षम आहे. एक डिमॅट खाते उघडून एखादी व्यक्ती सेक्युरिटीज, इलेक्ट्रॉनिक स्वरुपात ठेवू शकते आणि त्याच्या/ तिच्या डिमॅट खात्यातून अन्य कोणत्याही डिमॅट खात्यात सेक्युरिटीजचे हस्तांतरण करू शकते. कॅपिटल मार्केटमध्ये डिपॉझिटरी आणि विविध स्टेकहोल्डर्स मधील आंतरिक दुव्यांना आकृती क्रमांक 2 मध्ये दाखविले आहे.

### एनएसडीएल डिपॉझिटरी प्रणाली




भारतातील कॅपिटल मार्केटसाठी एनएसडीएलच्या योगदानाने त्याला जगातील विविध आघाड्यांवर असलेल्या भांडवली बाजारांमधील अग्रगण्य भांडवल बाजार बनविले आहे. विविध उत्पादने आणि सेवांसाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या अवलंबनासह आणि देशात सर्वत्र सेवाजाळे पसरवून एनएसडीएलने गुंतवणूकदारांचा आणि इतर मध्यस्थांचा भरवसा जिंकला आहे आणि Technology, Trust and Reach (तंत्रज्ञान, विश्वास आणि पोहोच) या आपल्या प्रचार वाक्यास सत्यात उतरविले आहे.

एनएसडीएल त्याच्या गुंतवणूकदार, स्टॉक ब्रोकर्स, स्टॉक एक्स्चेंजेस, कस्टोडियन्स इत्यादींना त्याच्या 275 पेक्षा जास्त डीपीजच्या (डिपॉझिटरी पार्टिसिपंट) नेटवर्कद्वारा अनेक सेवा पुरविते. अनेक मोठ्या बँका (राष्ट्रीयीकृत, खाजगी आणि सहकारी), स्टॉक ब्रोकर्स आणि वित्तसंस्था डीपीज म्हणून एनएसडीएलमध्ये सामील झाल्या आहेत. एनएसडीएल डीपीज संपूर्ण देशभरात 30,700 पेक्षा जास्त सेवा केंद्रांमधून तसेच, विदेशातील काही केंद्रांद्वारे सुद्धा कार्यरत आहे. एनएसडीएल डीपीज आणि त्यांच्या सेवा केंद्रांची यादी https://nsdl.co.in/dpsch.php वर उपलब्ध आहे.

## डिमॅट जाणून घेणे

### 'डिमॅट' चा अर्थ काय आहे?

डिमॅट हे सेक्युरिटीज इलेक्ट्रॉनिक स्वरुपात ठेवण्याचे किंवा राखण्याचे एक स्वरूप आहे. कागदी स्वरुपात असलेल्या सेक्युरिटीजला राखण्यासाठी हा एक कायदेशीर पर्याय आहे.

### डिपॉझिटरी म्हणजे काय?

डिपॉझिटरी ही शेअर्ससाठी असलेल्या एखाद्या बँकेसारखी आहे. जसे आपण एखाद्या बँकेत एका बचत खात्यात पैसे ठेवतो, तसेच आपण शेअर्स इ. मधील आपली गुंतवणूक, डिपॉझिटरीकडे एका डिमॅट खात्यात ठेवू शकतो. जसे बँक आपल्या खात्यातून रक्कम दुसऱ्या व्यक्तीच्या खात्यात हस्तांतरित करण्यात मदत करते, तसेच डिपॉझिटरी सुद्धा शेअर्स, सेक्युरिटीज इ. एका डिमॅट खात्यातून दुसऱ्या डिमॅट खात्यात हस्तांतरित करण्यात आपली मदत करते. जसे, बँक ग्राहकांसाठी त्याच्या शाखांद्वारे सेवांचा विस्तार करते, तसेच डिपॉझिटरी त्यांच्या एजंट्सच्या नेटवर्कद्वारा ज्यांना डीपी (डिपॉझिटरी पार्टिसिपंट) म्हणतात, त्याच्या द्वारे सेवांचा विस्तार करते. या सोबतच, कॅपिटल मार्केटमध्ये विविध शेअरहोल्डर्ससाठी इतर अनेक सेवा प्रस्तुत करते.

### डिपॉझिटरी खाते काय असते?

डिपॉझिटरी खाते हे एका बँकेच्या खात्याप्रमाणे असते, जे डिपॉझिटरीकडे ठेवलेले असते. जसे एखादे बँकेचे खाते पैसे ठेवण्यासाठी आणि त्यांचा व्यवहार करण्यासाठी वापरले जाते, तसेच डिपॉझिटरी खाते डिमॅट खातेधारकांसाठी सेक्युरिटीज ठेवण्यासाठी आणि त्यांचा व्यवहार करण्यासाठी वापरले जाते. डिपॉझिटरी खाते डिमॅट खाते म्हणून सुपरिचित आहे.

## डिपॉझिटरी पार्टिसिपंट कोण असतो?

डिपॉझिटरी ही त्यांच्या एजंट्सद्वारा गुंतवणूकदारांना सेवा पुरविते ज्यांना डिपॉझिटरी पार्टिसिपंट्स (डीपीज) म्हणतात. हे एजंट्स एनएसडीएलद्वारा, सेबीसोबत त्यांच्या नोंदणीनंतर नियुक्त केलेले असतात. डिपॉझिटरीद्वारा देऊ केल्या जाणाऱ्या सेवा गुंतवणूकदाराला हव्या असतील, तर त्याला/ तिला कोणत्याही डीपीकडे एक डिमॅट खाते उघडण्याची गरज असते. हे बँकेच्या सेवांचा वापर करण्यासाठी बँकेत उघडलेले एक बचत खात्यासारखेच असते. तुम्हाला https://nsdl.co.in/dpsch.php वर डीपीजची यादी मिळू शकते.

## डिमॅट खाते असण्याचे कोणते फायदे आहेत?

डिमॅट खात्याचे फायदे खालीलप्रमाणे आहेत:

a. सेक्युरिटीजचे तत्काळ हस्तांतरण.
b. सेक्युरिटीजच्या हस्तांतरणावर मुद्रांक शुल्क नाही.[1]
c. फिजिकल सर्टिफिकेटमध्ये असलेले धोके दूर होतात, जसे विलंबाने पोच, बनावट सेक्युरिटीज, इ.
d. सेक्युरिटीजच्या हस्तांतरणात सामील कागदोपत्री व्यवहार कमी होतात.
e. व्यवहार खर्च कमी होतो.
f. पत्ता/ बँक खात्याचे तपशील, इ. मध्ये बदल करावयाचा असल्यास ते सहजपणे होते, कारण डिमॅट खात्यात केलेला पत्ताबदल, मो. नं. बदल, ईमेल आयडीबदल इ. सर्व संबंधित कंपन्यांना कळविली जातात आणि प्रत्येकाशी स्वतंत्र पत्रव्यवहार करण्याची गरज टाळली जाते.

[1]वित्तवर्ष 2019-20 साठी प्रस्तावित आर्थिक विधेयकातील बदलांच्या अधीन

g. संपूर्ण प्रक्रिया डीपीद्वारा केली जात असल्यामुळे सेक्युरिटीज पाठविण्यात सुलभता येते आणि कंपन्यांशी पत्रव्यवहाराची गरज पडत नाही.

h. फ़ोलिओचे/ खात्यांचे एकत्रीकरण करण्याची सुविधा.

i. इक्विटी, डिबेंचर्स, बाँड्स, गव्हर्मेंट सेक्युरिटीज, सॉव्हरिजन गोल्ड बाँड्स, म्युच्युअल फंड युनिट्स यांच्यासारखे विविध प्रकारच्या सेक्युरिटीज एकाच खात्यात राखण्याची सोय.

j. विभागणी / एकत्रीकरण / विलीनीकरण इ. द्वारे निर्माण होणारे शेअर्स, म्युच्युअल फंड युनिट्स डिमॅट खात्यामध्ये आपोआप जमा होणे.

## एनएसडीएलद्वारे पुरविल्या जाणाऱ्या सेवा

एक डिपॉझिटरी या नात्याने, एनएसडीएल गुंतवणूकदार, इश्यूअर कंपन्या, स्टॉकब्रोकर्स आणि क्लियरिंग कॉर्पोरेशन्स यांना विविध सेवा पुरविते. अशा कोणत्याही सेवा प्राप्त करण्यासाठी गुंतवणूकदाराला एखाद्या डिपॉझिटरी पार्टिसिपंटकडे जावे लागते.

## डिमॅट खाते उघडणे

1. एनएसडीएल डिमॅट खाते कसे उघडावे?

   डिमॅट खाते उघडणे अतिशय सोपे आहे. तुम्हाला केवळ एनएसडीएल डीपीकडे जावे लागेल, जे तुम्हाला औपचारिकता पूर्ण करण्यास मदत करतील. तुम्हाला एक अर्ज भरावा लागेल, 2 फोटोज, पॅन कार्ड आणि पत्त्याचा पुरावा द्यावा लागेल. यासोबत तुम्हाला तुमच्या बँकेच्या खात्याचे तपशील द्यावे लागतील.

   तुमचे डिमॅट खाते उघडल्यानंतर, तुमचा डीपी तुम्हाला डीपीआयडी आणि क्लायंट आयडी, तुमच्या डिमॅट खात्याशी संबंधित तपशील असलेल्या तुमच्या क्लायंट मास्टर रिपोर्टची एक प्रत, शुल्क पत्रक आणि बेनेफिशीअरी ओनरचे ‘राईट्स आणि ऑब्लीगेशनस्’ हे पत्रक उपलब्ध करून देतील. डीपी आयडी हा 8 अक्षरांचा लांब कोड असतो, (उदा. IN3XXXXX) जो सर्व डीपीजला ओळखण्यासाठी एनएसडीएलद्वारे दिलेला असतो. क्लायंट आयडी 8 अंकी लांब कोड असतो, जो सिस्टीम मधील क्लायंट्स ओळखण्यासाठी वापरला जातो. डीपी आयडी आणि क्लायंट आयडी मिळून तुमचा एनएसडीएलमध्ये एक विशेष खाते क्रमांक बनतो.

   तुम्ही डिपॉझिटरी सिस्टीममध्ये अचूकपणे नोंदविलेल्या तुमच्या सर्व तपशिलांची खात्री करण्यासाठी क्लायंट मास्टर रिपोर्टची पडताळणी केली पाहिजे. तुम्हाला शेअर्सची खरेदी-विक्री करावयाची असेल, तर तुम्हाला कोणत्याही एका सेबी नोंदणीकृत

स्टॉकब्रोकरसोबत ट्रेडिंग/ ब्रोकिंग खाते उघडण्याची देखील गरज असेल. असे अनेक डीपीज आहेत, जे गुंतवणूकदारांच्या फायद्यासाठी 3-इन-1 व्यवस्था देऊ करतात (3-इन-1 म्हणजे डिमॅट खाते, ट्रेडिंग खाते आणि बँक खाते हे एकत्र देणे).

2. मी डीपी कसा निवडावा?

तुम्ही बचत खाते उघडण्यासाठी जशी बँक निवडता त्याचप्रमाणे डिमॅट खाते उघडण्यासाठी तुमचा डीपी निवडू शकता. डीपीच्या निवडीसाठी काही महत्त्वाचे घटक खालीलप्रमाणे असू शकतात:

a. अनुकुलता - तुमच्या कार्यालयाच्या/ निवासस्थानाच्या सान्निध्यात, तुम्हाला सोयीच्या कामाच्या वेळा.
b. समाधान - डीपीची प्रतिष्ठा, संस्थेशी इतर संबंध, तुम्हाला गरज असलेल्या सेवा देण्याची डीपीमध्ये क्षमता आहे का?
c. सेवेचा खर्च/ पातळी - डीपीद्वारा आकारली जाणारी सेवा शुल्के आणि सेवेचा दर्जा.

डीपी असलेल्या स्थानांची यादी आणि त्यांच्या तुलनात्मक शुल्कांची संरचना यांच्यासाठी कृपया https://nsdl.co.in/joining/joincharges.php वर भेट द्या.

3. सर्व डीपीज सारखेच असतात काय?

डीपी बनण्यासाठी एनएसडीएलने काही ठराविक मुलभूत पात्रता निर्देशित केल्या आहेत. हे निकष काही बाबींमध्ये सेबी नियमनाच्या संबंधित तरतुदींप्रमाणेच किंवा त्याहून अधिक आहेत. एनएसडीएलद्वारा नियुक्त असल्यामुळे सर्व डीपीज सारख्याच प्रकारच्या सुविधा देत असतात. त्यांना सेबीकडून नोंदणी प्रमाणपत्र मिळाल्यानंतर डीपी बनवले जाते. तथापि, दिल्या जाणाऱ्या सेवांचा प्रकार, सेवेची पातळी आणि दिल्या जाणाऱ्या सेवांसाठी शुल्के वेगवेगळ्या डीपीमध्ये वेगवेगळे असू शकतात.


4. जर मला डिमॅट खाते उघडायचे असल्यास मी काय करावे?

एखाद्या ठराविक डीपीकडे तुम्ही खाते उघडायचे ठरविल्यानंतर, तुम्ही त्या डीपीकडे जाऊ शकता आणि खाते उघडण्याचा अर्ज भरू शकता. तुम्हाला तुमची 2 छायाचित्रे आणि खालील कागदपत्रांची स्वयं-प्रमाणित प्रत द्यावी लागेल-

a. पॅन कार्ड (सिक्कीमचे रहिवासी, ज्यांच्याकडे कदाचित पॅन नसू शकतो, त्यांच्यासाठी अन्य ओळखपत्र)
b. पत्त्याचा पुरावा (पारपत्र, वाहनचालक परवाना, मतदार ओळखपत्र, आधार कार्ड आणि एनआरईजीए जॉब कार्ड यापैकी कोणतेही एक).
c. रद्द केलेला धनादेश किंवा पासबुक किंवा खात्याचे विवरण ज्यात तुमचे नाव, खाते क्रमांक, आयएफएससी किंवा एमआयसीआर कोड असेल.

डीपीकडे जाताना पडताळणीसाठी कृपया मूळ कागदपत्रे घेऊन जाण्याचे लक्षात ठेवा. जर पडताळणीसाठी तुम्ही मूळ कागदपत्रे सादर करू शकला नाहीत, तर त्याची छायाप्रत कोणत्याही अधिकृत व्यक्ती, जसे पब्लिक नोटरीद्वारा अधिकृत केलेली असावी. तुमचे डीपी वर उल्लेखित कागदपत्रांच्या सोबत त्यांच्या आवश्यकता पूर्ण करण्यासाठी ओळख/ पत्त्याचा अतिरिक्त पुरावा मागू शकतात. खाते उघडण्याची प्रक्रिया आकृती क्र. 3 मध्ये दाखविलेली आहे.

## डिमॅट खाते उघडण्याची प्रक्रिया




**आकृती 3**

5. व्यक्तिगत पडताळणी काय असते?

खाते उघडताना आवेदकाची ओळख प्रस्थापित करणे सेबीच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार अनिवार्य आहे. डीपीच्या कर्माचाऱ्यांद्वारे ही पडताळणी खाते उघडण्याच्या अर्जावर जोडलेल्या छायाचित्राची त्या व्यक्तीच्या पॅन कार्डवर असलेल्या छायाचित्रासोबत प्रत्यक्ष व्यक्तीला पाहून केली जाते. जॉइंट (जॉइंट) खातेधारकांसाठी, सर्व धारकांसाठी 'व्यक्तिगत पडताळणी' आवश्यक असते.

6. मी एकपेक्षा जास्त डिमॅट खाती उघडू शकतो/ शकते काय?

   होय. तुम्ही तुमच्या गरजेनुसार आणि पसंतीनुसार एकाच डीपीसोबत किंवा विभिन्न डीपीजसोबत एकापेक्षा जास्त खाती उघडू शकता. तुम्हाला अशा सर्व उघडलेल्या खात्यांसाठी शुल्के देण्याची गरज पडू शकते याची कृपया नोंद घ्यावी.

7. मला माझ्या डिमॅट खात्यामध्ये सेक्युरिटीजची किमान शिल्लक राखणे जरुरी असते काय?

   नाही. डिपॉझिटरीनी कोणत्याही किमान शिल्लक असण्याबद्दल कोणताही नियम केलेला नाही. तुमच्या डिमॅट खात्यामध्ये तुम्ही शून्य शिल्लक देखील राखू शकता.

8. खाते उघडताना मी माझ्या बँकेच्या खात्याचे तपशील का द्यावेत?

   डिमॅट खाते उघडताना बँकेच्या खात्याचे तपशील देणे अनिवार्य आहे. हे बँकेचे तपशील जारीकर्ता कंपन्या / आरटीएज यांना तुम्हाला थेट तुमच्या बँकेच्या खात्यात देय असलेल्या कोणत्याही रकमेच्या हेतूसाठी (जसे डीवीडंड, व्याज किंवा मॅच्युरिटी पेमेंट किंवा रिडेम्प्शन रक्कम यांसारखे) कळविले जातील. यामुळे खाते उघडण्याच्या अर्जात तुम्ही तुमच्या सक्रीय बँक खात्याचे तपशील पुरविण्याचा तुम्हाला सल्ला दिला जातो. नंतर, त्यात बदल झाल्यास कृपया तुमच्या डीपीला ते कळविण्याचे लक्षात ठेवा.

9. खाते उघडण्याच्या अर्जात दिलेली ‘ऑटोमॅटीक क्रेडिट प्राप्त करण्यासाठी स्टँडिंग इंस्ट्रक्शन’ काय असते?

   डिमॅट खात्यामध्ये डेबिट किंवा क्रेडिट व्यवहार हे फक्त तेव्हाच करण्यास अनुमती आहे, जेव्हा ते संबंधित धारका(कां)ने अधिकृत केले आहे. डिमॅट खात्यातील प्रत्येक डेबिट हस्तांतरणासाठी डिलिव्हरी इन्स्ट्रक्शन स्लिपची (डीआयएस) गरज पडत असल्यामुळे, त्या डिमॅट खात्यातील प्रत्येक क्रेडिट हस्तांतरणासाठी एक ‘रिसीट इन्स्ट्रक्शन स्लिप’ची आवश्यकता असते. तुमच्या डीपीला एकदाच स्टँडिंग इंस्ट्रक्शन

देऊन, त्या खात्यामध्ये एखाद्या क्रेडीटची अपेक्षा असताना, तुमच्या डीपीला प्राप्तीच्या सूचना देणे टाळू शकता.

10. मी बँकेतील एखाद्या खात्याप्रमाणेच 'इदर ऑर सरव्हायवर' आधारावर जॉइंट खाते चालवू शकतो/ शकते काय?

नाही. सध्या लागू असलेल्या नियमांनुसार, डिमॅट खाते बँकेच्या खात्यप्रमाणे 'इदर ऑर सरव्हायवर' आधारावर चालविले जाऊ शकत नाही. त्यामुळे जॉइंटपणे असलेल्या एखाद्या डिमॅट खात्यासाठी दिलेल्या प्रत्येक सूचनेवर सर्व जॉइंट धारकांची स्वाक्षरी असणे आवश्यक असेल.

11. मी माझे सर्व सेक्युरिटीज दुसऱ्या डीपीकडे असलेल्या खात्यात हस्तांतरित करून एखाद्या डीपीकडे असलेले माझे डिमॅट बंद करु शकतो/ शकते का?

होय. तुमच्याकडे एक किंवा एकापेक्षा जास्त डीपीजकडे एकापेक्षा जास्त डिमॅट खाती असल्यास आणि तुम्हाला ती चालू ठेवायची नसल्यास, तुम्ही विहित स्वरुपात तुमच्या डीपी(ज)ना खाते बंद करण्याचा अर्ज सादर करू शकता. त्या अर्जात तुम्हाला तुमची शिल्लक कोठे हस्तांतरित करावयाची आहे त्या खात्याचा डीपी आयडी, डीपीचे नाव आणि क्लायंट आयडी लिहावे लागेल. तुमचा डीपी तुमच्या सर्व सेक्युरिटीज तुमच्या सुचनेनुसार हस्तांतरित करेल आणि तुमचे डिमॅट खाते बंद करेल. डिमॅट खात्यामध्ये कोणतीही शिल्लक असल्यास ते खाते बंद केले जाऊ शकणार नाही हे जाणणे देखील महत्त्वाचे आहे.

12. माझ्या एनएसडीएल डिमॅट खात्यामधून मी काय करू शकतो/ शकते?

एनएसडीएल डिमॅट खात्याचे अनेक उपयोग आहेत. तुमच्या एनएसडीएल डिमॅट खात्यासह तुम्ही करू शकत असलेल्या काही महत्त्वाच्या गोष्टी खाली सूचित केल्या आहेत -

a. तुम्ही आयपीओज आणि एनएफओजसाठी अर्ज करू शकता. त्या अर्जावर तुमचा डीपी आयडी आणि क्लायंट आयडी अचूकपणे नोंदविण्यास विसरू नका. तेच डिमॅट

खाते शेअर्स खरेदी करण्यासाठी आणि त्यांना राखण्यासाठी आणि इतर प्रकारच्या सेक्युरिटीजसाठी वापरले जाऊ शकते.

b. तुम्हाला तुमच्या डिमॅट खात्यामध्ये आपोआप सर्व कॉर्पोरेट लाभ (बोनस, राईट्स इश्यू, इ.) मिळतील. तुमच्या कंपनीद्वारा घोषित डीवीडंडसारखे रोख लाभ, तुमच्या बाँडमधील गुंतवणुकींवरील व्याज किंवा मॅच्युरिटी पेमेंट इ. तुमच्या डिमॅटला जोडलेल्या बँकेच्या खात्यात जमा होतील. तुमच्या डिमॅट खात्यात तुमच्या बँकेच्या खात्याचे अचूक तपशील नोंदविल्याची खात्री करा.

c. तुम्ही 'शेअर्सवर कर्ज' मिळविण्यासाठी तुमच्या डिमॅट खात्याचा वापर करू शकता, अशी सेवा गुंतवणुकी न विकता तुमच्या आर्थिक गरजा भागविण्यासाठी अनेक बँकांद्वारा पुरविली जाते.

d. तुम्ही शेअर्स, बाँड्स, डिबेंचर्स, गव्हर्मेंट सेक्युरिटीज, सॉव्हरिजन गोल्ड बाँड्स, इ. मधील तुमच्या गुंतवणुकी तुमच्या डीपीद्वारा कागदी स्वरूपातून डिमॅट स्वरुपात बदलू शकता.

e. तुम्ही तुमच्या म्युच्युअल फंडमधील गुंतवणुकी त्याच डिमॅट खात्यात ठेवू शकता. म्युच्युअल फंड युनिट्स डिमॅट खात्यात ठेवल्याने तुमच्यासाठी अनेक गोष्टी सोप्या होतील. तुम्ही एनएसडीएल सीएएसद्वारा एकाच ठिकाणी तुमच्या पोर्टफोलिओचे संनिरीक्षण करू शकता. तसेच यामुळे तुमच्या व्यक्तिगत माहितीमध्ये तुम्हाला कोणताही बदल करावयाचा असेल, उदा. पत्ता किंवा बँकेचा तपशील किंवा नॉमिनी इ., तर तुम्हाला विविध म्युच्युअल फंड हाउसेसशी संपर्क साधण्याची गरज राहणार नाही. तुम्ही अर्जामध्ये केवळ तुमचा डीपी आयडी आणि क्लायंट आयडी लिहून तुम्ही डिमॅट स्वरुपात म्युच्युअल फंड युनिट्स सबस्क्राईब करू शकता. तुमच्या डिमॅट खात्याद्वारे एसआयपी काढून म्युच्युअल फंड्समधील गुंतवणूक देखील शक्य आहे. म्युच्युअल फंड युनिट्सच्या रिडम्पशन किंवा रि-

पर्चेस करण्यासाठी तुम्ही तुमच्या डीपीला सूचना देऊ शकता किंवा एनएसडीएलची स्पीड-ई सुविधा वापरू शकता.

f. तुम्ही तुमच्या डिमॅट खात्याद्वारे शेअर्स देऊन कंपनीच्या शेअर्स बाय बॅक प्रस्तावात देखील सहभागी होऊ शकता.

g. तुम्ही तुमच्या डिमॅट खात्यात निष्क्रिय असलेल्या सेक्युरिटीज लैंडिंग आणि बॉरोइंग स्कीमद्वारे सेक्युरिटीज लेंडिंगमध्ये सहभागी होऊन बाजारपेठेचे फायदे मिळवू शकता.

## बेसिक सर्विसेज डिमॅट खाते

1. बेसिक सर्विसेज डिमॅट खाते (बीएसडीए) म्हणजे काय?

बीएसडीए हे एक रेग्युलर डिमॅट खाते असते, ज्यात वार्षिक देखभाल शुल्के नसतात किंवा अत्यल्प असतात.

2. बीएसडीएचे फायदे मिळण्यासाठी कोणत्या अटी आहेत?

खालील अटींचे पालन केले असलेल्या व्यक्तींना बीएसडीएचे फायदे मिळू शकतात -

a. अशा व्यक्ती ज्यांच्याकडे एकच डिमॅट खाते असते आणि ते एकमेव किंवा पहिले धारक असतात (सर्व डिपॉझिटरीजमध्ये).

b. व्यक्ती अन्य डिमॅट खाते(ती) असलेले दुसरे किंवा तिसरे व्यक्ती असू शकतात.

c. कोणत्याही क्षणी त्या डिमॅट खात्यात असलेले सेक्युरिटीजचे मूल्य ₹4,00,000 पेक्षा जास्त नसेल.

d. बीएसडीएची सुविधा मिळविण्यासाठी मोबाईल क्रमांक पुरविणे आणि एसएमएस अलर्ट सुविधा निवडणे गरजेचे असते.

3. बीएसडीएसाठी वार्षिक देखभाल शुल्क (एएमसी) काय असतात?

खालील तक्ता बीएसडीएसाठी विविध परिस्थितीत लागू असलेल्या शुल्कांचे विवरण देतो -

| **अनु. क्र.** | **डेट सेक्युरिटीज मूल्य** | **डेट सेक्युरिटीजच्या व्यतिरिक्त सेक्युरिटीज** | **सेक्युरिटीज होल्डिंगचे एकूण मूल्य** | **एएमसी** |
|---|---|---|---|---|
| 1 | ₹ 50,000/- | ₹ 50,000/- | ₹ 1,00,000/- | एएमसी नाही |
| 2 | ₹1,00,000/- | ₹ 50,000/- | ₹ 1,50,000/- | एएमसी नाही |
| 3 | ₹ 1,50,000/- | ₹ 50,000/- | ₹ 2,00,000/- | कमाल ₹ 100 |
| 4 | ₹ 1,50,000/- | ₹ 1,00,000/- | ₹ 2,50,000/- | कमाल ₹ 100 |
| 5 | ₹ 2,00,000/- | ₹ 2,00,000/- | ₹ 4,00,000/- | कमाल ₹ 100 |
| 6 | ₹ 2,00,000/- | ₹ 2,50,000/- | ₹ 4,50,000/- | रेग्युलर अकाउंटप्रमाणे |
| 7 | ₹ 3,00,000/- | ₹ 3,00,000/- | ₹ 6,00,000/- | रेग्युलर अकाउंटप्रमाणे |
| 8 | ₹ 2,50,000/- | ₹ 2,00,000/- | ₹ 4,50,000/- | रेग्युलर अकाउंटप्रमाणे |
| 9 | ₹ 50,000/- | ₹ 2,50,000/- | ₹ 3,00,000/- | रेग्युलर अकाउंटप्रमाणे |
| 10 | ₹ 2,50,000/- | ₹ 50,000/- | ₹ 3,00,000/- | रेग्युलर अकाउंटप्रमाणे |


## सेक्युरिटीजचे डिमटेरियलायझेशन

1. डिमटेरियलायझेशन म्हणजे काय?

डिमटेरियलायझेशन एक अशी प्रक्रिया असते, ज्याद्वारे सेक्युरिटीजच्या कागदी प्रमाणपत्रांना डीपीकडे असलेल्या गुंतवणूकदाराच्या डिमॅट खात्यातील क्रेडिटच्या मार्गे इलेक्ट्रॉनिक स्वरुपात बदलले जातात. डिमटेरियलायझेशन हे होल्डिंगच्या स्वरूपातील बदल करणे आहे, यामुळे मालकीहक्क बदलत नाही.

2. मी माझ्या सेक्युरीटीज प्रमाणपत्रांना डिमटेरियलाइझ कसे करू शकतो/ शकते?

प्रमाणपत्रे डिमटेरियलाइझ करण्यासाठी, तुम्हाला एक डिमॅट खाते उघडावे लागेल. एकदा डिमॅट खाते उघडले की तुम्हाला विहित स्वरुपात 'डिमटेरियलायझेशन विनंती अर्ज' भरावा लागेल आणि सेक्युरिटीज प्रमाणपत्रांसह तुम्हाला डीपीला सादर करावे लागेल. तुमचा डीपी डिमॅट विनंतीला पुढील प्रक्रियेसाठी संबंधित जारीकर्ता कंपनी किंवा त्याच्या रजिस्ट्रार आणि ट्रान्सफर एजंटकडे पाठवतील. संबंधित जारीकर्ता कंपनी किंवा त्याच्या रजिस्ट्रार आणि ट्रान्सफर एजंटद्वारा विनंतीची पुष्टी झाली की मग त्याची नोंदणी संबंधित गुंतवणूकदाराच्या डिमॅट खात्यात इलेक्ट्रॉनिक सेक्युरिटीज म्हणून जमा करण्यात येते. डिमटेरियलायझेशनची प्रक्रिया आकृती क्रमांक 4 मध्ये दर्शविली आहे:




**आकृती 4**

### 3. मी कोणत्याही शेअर सर्टिफिकेटस् ला डिमटेरियलाइझ करू शकतो/ शकते काय?

नाही, सर्व शेअर प्रमाणपत्रांना डिमटेरियलाइझ केले जाऊ शकत नाही. डिमटेरियलायझेशनसाठी, खालील अटींचे पालन करणे आवश्यक आहे -

a. तुम्ही केवळ त्याच शेअर सर्टिफिकेटस् ला डिमटेरियलाइझ करू शकता, जे अगोदरच जारीकर्ता कंपनी / त्याच्या आरटीएच्या नोंदींमध्ये तुमच्या नावाने नोंदणी झाले आहेत.

b. जारीकर्ता कंपनी एनएसडीएलमध्ये सामील झालेली असली पाहिजे आणि त्या शेअर्ससाठी आयएसआयएन घेतलेला असला पाहिजे.

c. शेअर कोणत्याही लीन किंवा चार्ज किंवा बोज्यापासून मुक्त असले पाहिजेत.

बहुतेक लिस्टेड आणि सक्रीय कंपन्या एनएसडीएलमध्ये सामील झाल्या आहेत आणि त्यांचे शेअर्स आणि इतर प्रकारच्या सेक्युरिटीज डिमॅटसाठी उपलब्ध आहेत. इतर अनेक कंपन्या एनएसडीएलमध्ये सामील होण्याच्या प्रक्रियेत आहेत. तुमच्या ताब्यात असलेले शेअर्स डिमॅटसाठी उपलब्ध आहेत किंवा नाही ते तपासण्यासाठी येथे पहा: https://nsdl.co.in/master_search.php.

4. डिमटेरियलायझेशनसाठी डीपीकडे माझी प्रमाणपत्रे सोपविण्याआधी मी कोणत्या खबरदाऱ्या घेतल्या पाहिजे?

तुम्ही खालील बाबींची काळजी घेतली पाहिजे -

a. तुम्ही त्या सेक्युरीटीजचे नोंदणीकृत मालक असल्याची पडताळणी करा.

b. सेक्युरीटीजच्या मालकीहक्काची रचना डिमॅट खात्यात असल्याप्रमाणेच पाहिजे, ज्यातून तुम्ही डिमॅट विनंती सुरु करू इच्छित आहात. (जर रचना वेगळी असेल तर, खालील प्र. 13 चे उत्तर बघा).

c. तुम्हाला डिमटेरियलाइझ करावयाचे सेक्युरिटीज एनएसडीएलमध्ये डिमॅटसाठी खरंच उपलब्ध असल्याची पडताळणी करा.

d. तुमच्याकडे असलेल्या शेअर्सच्या कंपनीच्या सेवा आरटीएद्वारा थांबविल्या गेल्या नसल्याचे तपासून घ्या. याला https://nsdl.co.in/list-comp.php वर शोधले जाऊ शकते.

e. वरील चरण पूर्ण झाल्यानंतर, तुम्हाला डिमटेरियलाइझ करावयाची इच्छा असलेल्या शेअर्स प्रमाणपत्रांना 'सरंडर्ड फॉर डिमटेरियलायझेशन' असे लिहून चिन्हांकित केले पाहिजे. यासाठी तुमचा डीपी तुम्हाला रबर स्टॅंप देईल.

सर्टिफिकेटस् वरीलप्रमाणे योग्य रितीने चिन्हांकित केल्याची खात्री झाल्यानंतर, पुढील प्रक्रियेसाठी तुमचा डीआरएफ शेअर सर्टिफिकेटस् सह डीपीकडे सादर करू शकता.

## 5. डिमटेरियलायझेशन प्रक्रिया कशी घडते?

सेबीच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार, डीपीने 7 दिवसांच्या आत डिमॅट विनंतीवर प्रक्रिया करणे आवश्यक असते. पुढे, जारीकर्ता कंपनी / त्याचा आरटीए त्याला मिळालेल्या डिमॅट विनंतीच्या प्रक्रियेसाठी 15 दिवसांपर्यंत[2] वेळ घेऊ शकतात. डीपीकडून कागदपत्रांच्या हस्तांतरणासाठी लागणाऱ्या वेळेस लक्षात घेता, जारीकर्ता कंपनी / आरटीए, डिमटेरियलायझेशनसाठी सामान्यपणे 30 दिवसांचा वेळ लागतो.

## 6. स्वतंत्र मालकी असलेल्या सेक्युरीटीजसाठी आणि माझ्या पत्नीसोबत/ पतीसोबत जॉइंट मालकी असलेल्या सेक्युरीटीजला डिमटेरियलाइझ करण्यासाठी मी एकच खाते उघडू शकतो/ शकते काय?

नाही. डिमॅट त्याच मालकीहक्काच्या रचनेत उघडले पाहिजे, ज्यात सेक्युरीटीज कागदी स्वरुपात ठेवलेले असेल. उदा. एक शेअर सर्टिफिकेट तुमच्या नावावर असेल आणि दुसरे शेअर सर्टिफिकेट तुमच्या आणि पत्नीच्या नावासोबत असेल, तर तुम्हाला दोन डिमॅट खाती उघडावी लागतील (एक तुमच्या नावावर आणि दुसरे तुमच्या पत्नी आणि तुमच्या जॉइंट नावाने).

## 7. माझी विकण्याची इच्छा नसलेल्या सेक्युरिटीजना डिमटेरियलाइझ करण्याची आवश्यकता आहे काय?

---

[2]सेबीने आरटीएजना डिमॅट विनंत्यांवर प्रक्रिया करण्यासाठी 30 जून 2019 पर्यंत 30 दिवसांची मुदत दिली आहे.

डिपॉझिटरीज कायदा, 1996 गुंतवणूकदारांना सेक्युरिटीज कागदी स्वरुपात किंवा डिमॅट स्वरुपात राखण्याचा पर्याय देते. त्यामुळे तुम्हाला सेक्युरिटीज विकण्याची इच्छा नसेल, तर तुम्हाला त्यांना डिमटेरियलाइझ करण्याची गरज नाही. तथापि, सेक्युरिटीज डिमॅट स्वरुपात राखण्याचे अनेक फायदे आहेत आणि त्यामुळे त्याची खास शिफारस केली जाते. पुढे, कागदी स्वरुपात असल्यास, लिस्टेड कंपन्या आणि लिस्टेड नसलेल्या पब्लिक लिमिटेड कंपन्यांच्या सेक्युरिटीजच्या हस्तांतरणावर विद्‌यमान / प्रस्तावित प्रतिबंध आहेत. त्यामुळे सेक्युरिटीज डिमटेरियलाइझ करणे योग्य ठरेल. सेबीच्या नवीन नियमानुसार 1 एप्रिल 19 पासून सेक्युरिटीज विकल्यास त्याची सेटलमेंट प्रक्रिया फक्त डीमॅट मधेच होईल. म्हणजेच ही गोष्ट अनिवार्य आहे.

8. मी लॉक-इनमध्ये असलेल्या टॅक्स-फ्री बॉंड्समधील माझी गुंतवणूक डिमटेरियलाइझ करू शकतो/ शकते काय?

होय. तुम्ही लॉक-इनमध्ये असताना देखील तुमचे टॅक्स-फ्री बॉंड्स डिमटेरियलाइझ करू शकता. डिमॅटची प्रक्रिया शेअर्सच्या डिमॅटसाठी लागू असलेल्या प्रक्रीयेसारखीच आहे. तुम्हाला पूर्ण भरलेला आणि स्वाक्षरी केलेला डीआरएफ तुमच्या डीपीला बॉंड्स प्रमाणपत्रांसह सादर करावा लागेल. डीपी संबंधित जारीकर्त्याकडे/ त्याच्या आरटीएकडे ती विनंती पाठवेल आणि पुष्टीनंतर तुमच्या डिमॅट खात्यात ते क्रेडीट करण्यात येतील.

9. मी थेट डिमॅट स्वरुपात गव्हर्नमेंट सेक्युरिटीज खरेदी करू शकतो/ शकते काय?

होय. आता बॉंड्स आणि ट्रेझरी बिल्स (टी-बिल्स) सारख्या गव्हर्नमेंट सेक्युरिटीज रिटेल गुंतवणूकदारांना सहजपणे उपलब्ध आहेत. खरं तर, आरबीआय नव्या इशुजचा एक भाग रिटेल गुंतवणूकदारांसाठी राखून ठेवते. तुम्ही नव्या सेक्युरिटीजच्या लिलावात सहभागी होऊन किंवा विद्‌यमान सेक्युरिटीज सेकंडरी मार्केटमध्ये विकत घेऊन जी-सेकमध्ये गुंतवणूक करू शकता. दोन्हीसाठी, तुम्हाला तुमच्या डिमॅट खात्याच्या तपशिलांचा (डीपी आयडी आणि क्लायंट आयडी) उल्लेख करून कोणत्याही अधिकृत बँक किंवा प्रायमरी डीलर किंवा स्टॉक ब्रोकरकडे जावे लागेल.

10. मी डिमॅट स्वरुपात सॉव्हरिन गोल्ड बॉंड्स (एसजीबी) साठी कसे सबस्क्राइब करू शकतो/ शकते?

सोन्याला कागदी स्वरुपात राखण्यासाठी एसजीबी हा एक श्रेष्ठ पर्याय आहे. डिमॅट स्वरुपात एसजीबी राखण्याचा पर्याय याला अजूनच उत्तम आणि सुविधाजनक बनवितो. सॉव्हरिन गोल्ड बाँड्स डिमॅट स्वरुपात खरेदी करण्याची किंवा त्याच्यासाठी सबस्क्राइब करण्याची प्रक्रिया अतिशय सोपी आहे. तुम्हाला केवळ तुमच्या सबस्क्रिप्शन अर्जावर डीपी आयडी आणि क्लायंट आयडीचा उल्लेख करावा लागेल. काही बँका ऑनलाइन अर्जाच्या सुविधा देखील देऊ करतात (जर गुंतवणूकदाराने ऑनलाइन अर्ज केला आणि इलेक्ट्रॉनिक पेमेंट केले, तर सध्या त्या किमतीत काही सूट देखील दिली जाते). आरबीआयद्वारे वाटप झाल्यानंतर, तुमच्या डिमॅट खात्यात मागणी केलेली बाँड्सची संख्या जमा केली जाते.

11. मी पेपर स्वरुपात (होल्डिंग प्रमाणपत्राच्या स्वरुपात) असलेले सॉव्हरिन गोल्ड बाँड्समधील माझ्या गुंतवणुकीस डिमॅट स्वरुपात बदलू शकतो/ शकते का?

होय, तुम्ही असे करू शकता. यासाठी, तुम्ही ज्यांच्याकडून एसजीबीज खरेदी केले, त्या बँकेशी/ एजंटशी संपर्क साधावा लागेल. ते तुम्हाला एसजीबीज होल्डिंग प्रमाणपत्राच्या स्वरुपातून डिमॅट स्वरुपात बदलण्यास मदत करतील.

12. मी एसजीएलमध्ये असलेल्या गव्हर्नमेंट सेक्युरिटीजमधील माझ्या गुंतवणुकीस एनएसडीएल डीपीकडे असलेल्या माझ्या डिमॅट खात्यामध्ये बदलू शकतो/ शकते काय?

होय. तुम्हाला विहित स्वरूपातील पूर्ण भरलेला आणि स्वाक्षरी केलेला फॉर्म (डिमटेरियलायझेशन विनंती अर्ज - गव्हर्नमेंट सेक्युरिटीज म्हणून समजले जाते) ‘फॉर्म ऑफ ट्रान्सफर’सह तुमच्या डीपीला सोपवावे लागेल. तुमचा डीपी ती विनंती एनएसडीएलकडे पाठवेल. एनएसडीएल तुमच्या डिमॅट खात्यात आवश्यक क्रेडीट जमा करेल.

13. माझ्याकडे कागदी स्वरुपात समान कॉम्बीनेशनमध्ये असलेल्या नावाची प्रमाणपत्रे आहेत, पण नावांचा क्रम वेगवेगळा आहे. काही प्रमाणपत्रांमध्ये, मी पहिला धारक आहे आणि माझी पत्नी दुसरी धारक आहे, तर इतर काही प्रमाणपत्रांमध्ये, माझी पत्नी

पहिली धारक आहे आणि मी दुसरा धारक आहे. या प्रमाणपत्रांचे डिमटेरियलायझेशन करण्यासाठी मला दोन वेगवेगळी खाती उघडावी लागतील काय?

जॉइंट धारकांना त्या कंपनीला लिखित विनंती पाठवून नावांचा क्रम बदलून घेण्याचा हक्क असतो. असे करणे म्हणजे हस्तांतरण होत नाही. जॉइंट धारकांच्या क्रम बदलण्याला 'ट्रांसपोजिशन' असे म्हणतात. तथापि, ट्रांसपोजिशन सुविधा एखाद्या फोलियोमधील संपूर्ण होल्डिंगसाठी उपलब्ध असते, पण पार्ट होल्डिंगसाठी याची अनुमती नसते.

जर जॉइंट होल्डर्सचा एकच गट विविध नावांच्या क्रमाने सेक्युरिटीज धारण करत असेल, तर अशा सेक्युरिटीजच्या डिमटेरियलायझेशनसाठी एकाधिक डिमॅट खाती उघडण्याची गरज नसते. 'ट्रांसपोजिशन कम डिमॅट सुविधा' वापरून विभिन्न संयोजनांमधील प्रमाणपत्रांमध्ये असलेल्या सेक्युरिटीज एकाच डिमॅट खात्यामध्ये डिमटेरियलाइझ केल्या जाऊ शकतात. यासाठी, डिमटेरियलायझेशन रिक्वेस्ट फॉर्म (डीआरएफ) आणि एक अतिरिक्त फॉर्म ''ट्रांसपोजिशन कम डिमॅट फॉर्म' डीपीला सादर करावा लागेल. हे आकृती 5 मध्ये स्पष्ट केले आहे -

## 'ट्रांसपोजिशन कम डिमॅट सुविधा

| मधील नाव → | शेअर प्रमाणपत्र | डिमॅट खाते |
|---|---|---|
| दोन धारक | अ आणि ब<br>किंवा<br>ब आणि अ | अ आणि ब |
| तीन धारक | अ, ब, क<br>किंवा अ, क, ब<br>किंवा ब, अ, क<br>किंवा ब, क, अ<br>किंवा क, अ, ब<br>किंवा क, ब, अ | अ, ब आणि क |

ट्रान्सपोजिशन अर्जासह डिमटेरियलायझेशन विनंती फॉर्म (डीआरएफ) तुमच्या डीपीला सादर करा.

आकृती 5

## सेक्युरिटीजचे रिमटेरियलायझेशन

1. माझे इलेक्ट्रॉनिक होल्डिंग परत पेपर प्रमाणपत्रांमध्ये बदलले जाऊ शकतील काय?

होय. जर तुम्हाला तुमच्या सेक्युरिटीज परत कागदी स्वरुपात हव्या असतील, तर तुम्हाला विहित स्वरुपात 'रिमटेरियलायझेशन विनंती अर्ज' तुमच्या डीपीला सादर लागेल. आवश्यक तपासण्यांनंतर, तुमचा डीपी तुमची विनंती एनएसडीएलच्या डिपॉझिटरी सिस्टीमद्वारा संबंधित जारीकर्ता कंपनी / आरटीएकडे पाठवेल. कंपनी / आरटीए प्रमाणपत्रे छापेल आणि तुम्हाला थेट पाठवून देईल. विनंती करण्यापूर्वी डीपीकडून रिमटेरियलायझेशनचे दर जाणून घ्या.

## मार्केट ट्रेड आणि सेक्युरिटीज हस्तांतरण पूर्ण करणे

1. डिमटेरियलाइझ झालेल्या सेक्युरिटीज विकण्याची प्रक्रिया काय आहे?

डिमटेरियलाइझ झालेल्या सेक्युरिटीज विकण्याची प्रक्रिया अतिशय सोपी आहे, ती खालील प्रमाणे आहे -

a. तुम्हाला तुमच्या स्टॉकब्रोकरला विक्रीच्या सूचना द्याव्या लागतील.
b. एकदा तुमचा विक्रीचा आदेश कार्यान्वित झाला आणि तुमच्या आदेशाच्या अंमलबजावणीची तुम्हाला पुष्टी मिळाली, की तुम्हाला तुमच्या स्टॉकब्रोकरला, विकलेल्या सेक्युरिटीज द्याव्या लागतील जेणेकरून सेक्युरिटीज जमा करण्याचे दायित्त्व पूर्ण करता येईल. यासाठी पूर्ण भरलेली ‘डिलिव्हरी इन्स्ट्रक्शन स्लिप’ विहित कालावधीत तुम्हाला तुमच्या डीपीला सादर करावी लागेल.

c. डीआयएसमध्ये डीपीसाठी सूचना असेल की तुम्ही विकलेल्या सेक्युरिटीज तुमच्या खात्यातून वजा करणे आणि ब्रोकरच्या क्लियरिंग खात्यात जमा करणे. याव्यतिरिक्त हीच सूचना ऑनलाइन इलेक्ट्रॉनिक स्वरुपात देण्यासाठी एनएसडीएल स्पीड-ई सेवा वापरली जाऊ शकते.

d. एकदा तुमच्या डीपीने सूचनांची सफलतापूर्वक प्रक्रिया केली की, तुमच्या ब्रोकरला शेअर्स मिळतील आणि तो क्लियरिंगच्या कार्यासाठी सेक्युरिटीज जमा करण्याची व्यवस्था करेल.

e. क्लियरिंग कॉर्पोरेशनकडून (फंड) पैशांच्या प्राप्तीनंतर, तुमचा ब्रोकर तुमच्या जोडलेल्या बँकेच्या खात्यात विक्रीच्या योग्य क्रेडीट जमा करण्याची व्यवस्था करेल.

## 2. मी डिमॅट स्वरुपात सेक्युरिटीज कशा प्रकारे खरेदी करू शकतो/ शकते?

डिमॅट स्वरुपात सेक्युरिटीज खरेदी करण्याची प्रक्रिया अतिशय सोपी आहे, जी खालील प्रमाणे आहे -

a. तुम्हाला तुमच्या स्टॉकब्रोकरला खरेदीच्या सूचना द्याव्या लागतील.

b. एकदा तुमच्या खरेदीच्या आदेशाची अंमलबजावणी झाली आणि तुम्हाला तुमच्या आदेशाच्या अंमलबजावणीची पुष्टी मिळाली की पैसे देण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी तुम्हाला तुमच्या स्टॉकब्रोकरला उचित रक्कम पुरवावी लागेल.

c. तुमच्या ब्रोकरकडे (सेक्युरिटीज) पे-आऊट डेच्या दिवशी त्याच्या क्लियरिंग खात्यात सेक्युरिटीज जमा होतील.

d. तुमचा ब्रोकर त्याच्या डीपीला त्याच्या क्लियरिंग खात्यातून सेक्युरिटीज वजा करण्याची आणि तुम्ही खरेदी केलेल्या सेक्युरिटीज तुमच्या डिमॅट खात्यात जमा करण्याची सूचना देतील.

e. जर तुम्ही तुमच्या डिमॅट खात्यामध्ये स्टँडिंग इंस्ट्रकशन दिल्या नसतील, तर तुम्हाला क्रेडीट मिळवण्यासाठी तुमच्या डीपीला 'रिसिप्ट इंस्ट्रकशन' देण्याची गरज पडेल.

f. तुम्ही बुक क्लोजरच्या आधी याची खात्री करून घेतली पाहिजे की तुमचा ब्रोकर सेक्युरिटीज तुमच्या खात्यामध्ये हस्तांतरित करतो आहे की नाही. जर सेक्युरिटीज तुमच्या ब्रोकरच्या खात्यामध्ये राहिल्या, तर कंपनी कॉर्पोरेट लाभ (डीवीडंड, बोनस इ.) ब्रोकरला देईल. अशा प्रकरणी तुम्हाला तुमच्या ब्रोकरकडून ते लाभ मागून घ्यावे लागतील.

## 3. 'मार्केट ट्रेड्स' आणि 'ऑफ मार्केट ट्रेड्स' काय आहेत?

क्लियरिंग कॉर्पोरेशनद्वारा सेटल झालेल्या कोणत्याही व्यवहाराला 'मार्केट ट्रेड' असे म्हणतात. हे ट्रेड्स मान्यताप्राप्त स्टॉक एक्स्चेंजच्या प्लॅटफॉर्मवर स्टॉकब्रोकरद्वारा केले जातात. 'ऑफ मार्केट ट्रेड' असा ट्रेड असतो, ज्यात क्लियरिंग कॉर्पोरेशनच्या समावेशाविना दोन पक्षांदरम्यान व्यवहार पूर्ण केला जातो.

4. 'इंटर डिपॉझिटरी ट्रान्सफर' काय असते? कोणतेही आयएसआयएन इतर डिपॉझिटरीकडे स्थानांतरीत करणे शक्य आहे काय?

एका डिपॉझिटरीकडे असलेल्या डिमॅट खात्याकडून दुसऱ्या डिपॉझिटरीकडे असलेल्या डिमॅट खात्याकडे सेक्युरिटीजच्या हस्तांतरणाला इंटर डिपॉझिटरी ट्रान्सफर' (आयडीटी) असे म्हणतात. आयडीटी केवळ त्याच आयएसआयएनसाठी शक्य असते, जेथे दोन्ही डिपॉझिटरीजमध्ये सक्रीय असतात.

5. पार्शल अकाउंट ट्रांसफर म्हणजे काय?

जर तुम्ही सेटलमेंटच्या वेळी डिमॅट खात्यामध्ये उपलब्ध असलेल्या क्वांटीटीपेक्षा जास्त क्वांटीटीचे पे-इन इंस्ट्रक्शन दिले, तर तुमच्या डिमॅट खात्यातून उपलब्ध क्वांटीटी वजा केली जाईल. ऑफ मार्केट ट्रान्सफरच्या प्रकरणी, जर पर्याप्त शिल्लक उपलब्ध नसेल तर संपूर्ण सूचना असफल होते, याचा अर्थ सेक्युरिटीज वजा होत नाही.

6. मार्केटचा प्रकार आणि सेटलमेंट क्रमांक काय असतात?

प्रत्येक स्टॉक एक्स्चेंजवर खरेदी-विक्रीच्या विभिन्न प्रकारच्या ट्रेड विंडोजवर व्यवहार घडतात. या विंडोज मार्केटचा प्रकार आणि सेटलमेंट क्रमांक यांच्या संयोजनाद्वारे ओळखल्या जातात. तुम्ही डिलिव्हरी इंस्ट्रक्शन स्लिपमध्ये अचूक मार्केट प्रकार आणि सेटलमेंट क्रमांक (डिपॉझिटरी सिस्टीममध्ये याला सेटलमेंट डिटेल्स असे म्हणतात) लिहिणे महत्त्वाचे असते, जेणेकरून तुमची पे-इन ऑब्लीगेशन बरोबर सेटल होईल. हे तपशील ब्रोकरद्वारे जारी कॉंट्रॅक्ट नोटमध्ये आढळू शकतात.

7. टी+2 रोलिंग सेटलमेंट सायकल म्हणजे काय?

टी+2 रोलिंग सेटलमेंट यंत्रणेच्या अंतर्गत, दिवस 1 (टी) रोजी स्टॉक एक्स्चेंजच्या प्लॅटफॉर्मवर झालेल्या व्यापाराचे (खरेदी आणि विक्री) दोन दिवसांनतर संबंधित क्लियरिंग कॉर्पोरेशनद्वारा सेटलमेंट केले जाते, म्हणजेच दिवस 3 (टी+2). उदा. सोमवारी झालेल्या ट्रेड्सचे सेटलमेंट बुधवारी (सर्व कार्यालयीन दिवस असल्याचे गृहीत धरून) केले जाते. तसेच, मंगळवारी झालेल्या ट्रेड्सचे सेटलमेंट गुरुवारी केले जाते आणि असे चालत राहते. अशा प्रकारच्या सेटलमेंट प्रणालीला टी+2 रोलिंग सेटलमेंट असे म्हणतात.
क्लियरिंग कॉर्पोरेशन्स प्रत्येक सेटलमेंटसाठी सेक्युरिटीज तसेच पैशांच्या देण्या आणि घेण्यासाठी समयरेखा विहित करते. स्टॉकब्रोकर्सनी त्याचे पालन करावयाचे असते. असे करण्यात त्यांची मदत करण्यासाठी, डीपीज विक्री व्यापार (पैशांचा निपटारा बँकांमधून घडतो, त्यामुळे ते डिपॉझिटरी सिस्टीमच्या बाहेर असतात) करणाऱ्या ग्राहकांसाठी सेक्युरिटीजच्या पे-इनसाठी कालमर्यादा निश्चित करतात.

8. टी+2 रोलिंग सेटलमेंट सायकल प्रकरणी, जर मी माझ्या ब्रोकर / अधिकृत व्यक्तीद्वारे सोमवारी शेअर्स विकले, तर मला माझ्या डीपीला डिलिव्हरी इंस्ट्रक्शन केव्हा द्यावे लागतील?

ट्रेड सोमवारी घडल्यामुळे, सेक्युरिटीजचे पे-इन बुधवारी होईल, याचा अर्थ तुमच्या ब्रोकरला बुधवारी जसे क्लियरिंग कॉर्पोरेशनद्वारा विहित केले आहे, त्याच्या अगोदर सेक्युरिटीज मिळाल्या पाहिजेत. तुमच्या डीपीला तुम्ही दिलेल्या डिलिव्हरी इंस्ट्रक्शन स्लिपचे प्रक्रियण करण्यास काही वेळ लागत असल्यामुळे, त्याने सूचनांशी संबंधित पे-इनच्या सादरीकरणासाठी काही समयरेखा निर्धारित केलेली असेल (साधारणपणे पे-इनच्या आधीच्या दिवशी). तुमची डिलिव्हरी इंस्ट्रक्शन स्लिप दिलेल्या वेळ आणि तारखेअगोदर पोहोचण्याची खात्री तुम्ही केली पाहिजे. त्यामुळे, एकदा तुमच्या ब्रोकरकडून तुमच्या विक्री आदेशाला पुष्टी मिळाली की तुमच्या डीपीला तुमचे डिलिव्हरी इंस्ट्रक्शन स्लिप तुम्ही त्वरित सादर केली पाहिजे.

9. मला पे-इनसाठी इंस्ट्रक्शन स्लिप सादर करण्यासाठी अंतिम मुदतीविषयी कसे कळेल?

तुमचा डीपी तुम्ही डिलिव्हरी इंस्ट्रक्शन स्लिप सादर करण्यासाठीची समयरेखा निश्चित करेल आणि तुम्हाला कळवेल. हे सामान्यपणे तुमच्या माहितीसाठी डीपीद्वारा डीआयएस पुस्तिकेवर छापलेले असते.

10. जेव्हा मी शेअर्स खरेदी करतो, तेव्हा मला माझ्या ब्रोकरकडून किती वेळात सेक्युरिटीज मिळाले पाहिजेत?

तुम्ही आवश्यक रक्कम दिल्यानंतर, ब्रोकरने त्याच्या क्लियरिंग सदस्याच्या खात्यामध्ये सेक्युरिटीज हस्तांतरित झाल्यानंतर एका कार्यालयीन दिवसात त्या सेक्युरिटीज तुम्हाला दिल्या पाहिजेत.

11. 'ॲट क्लायंट्स रिस्क' बेसिसवर डीपीद्वारा इंस्ट्रक्शन स्लिपच्या स्वीकृतीचा अर्थ काय आहे आणि त्याचे काय महत्त्व आहे?

प्रत्येक डीपी डिलिव्हरी इंस्ट्रक्शन स्लिप्सच्या सादरीकरणासाठी निश्चित समयरेखा विहित करते. तुमचे इंस्ट्रक्शन स्लिप तुमच्या डीपीकडे अशी मुदत संपल्यानंतर पोहोचल्यास, तुमचा डीपी डिपॉझिटरी सिस्टीममध्ये त्याच्या अंमलबजावणीसाठी सीमित दायित्त्वासह त्याला स्वीकारू शकतो/ शकते. अशा प्रकरणी, डीपीज 'रिसिव्हड् लेट, सब्जेक्ट टू बेस्ट एफर्टस्' किंवा 'लेट रिसिव्हड् ॲट क्लायंट्स रिस्क' अशा प्रकारचे वर्णन असलेल्या शिक्क्यासह इंस्ट्रक्शन स्लिप्सवर (ग्राहकाची आणि तसेच त्याच्या कार्यालयाची प्रत) चिन्हांकित करतात. जर काही कारणास्तव डीपी डिपॉझिटरी सिस्टीममधील विलंबाने प्राप्त सूचनांची अंमलबजावणी करू शकले नाहीत, आणि परिणामी ग्राहक आपली पे-इन दायित्वे पूर्ण करू शकला नाही, कारण त्याचे आर्थिक नुकसान झाले आहे (लिलावाची शुल्के, इ.), तर त्यासाठी डीपीला जबाबदार ठरविले जाऊ शकत नाही.

12. डिलिव्हरी इंस्ट्रक्शन स्लिपच्या संदर्भात मी कोणत्या खबरदाऱ्या घेतल्या पाहिजेत?

डिलिव्हरी इंस्ट्रक्शन स्लिप्स हे बँक खात्याच्या धनादेश पुस्तिकेसारखेच असतात. डीआयएसच्या संदर्भात तुम्ही खालील मुद्द्यांची काळजी घेतली पाहिजे -

a. तुम्हाला तुमच्या डीपीकडून डीआयएस पुस्तक मिळाले आहे याची खात्री करा. वेगवेगळ्या (सुट्या) स्लिप्स स्वीकारू नका (तातडीच्या परिस्थितीतील गरजांना वगळता).

b. प्रत्येक डीआयएस पुस्तिका पूर्व-छापील आणि अनुक्रमांक असलेली असल्याची खात्री करा.

c. प्रत्येक डीआयएसवर तुमच्या क्लायंट आयडीचा शिक्का आधीपासून असेल किंवा पूर्व-छापील असल्याची खात्री करा.

d. तुमचे डीआयएस अन्य कोणाकडेही ठेवू नका. तुम्हाला गरज पडेल तेव्हा ते भरा आणि तुमच्या डीपीकडे सोपवा.

e. तुमची डीआयएस पुस्तिका सुरक्षितपणे ठेवा. जर कोणतीही स्लिप किंवा पुस्तिका हरवल्यास, त्वरित तुमच्या डीपीला लिखित स्वरुपात कळवा.

f. जर डीआयएसमध्ये एकापेक्षा जास्त सूचनांसाठी जागा असेल, आणि तुम्ही सर्व जागा वापरत नसाल, तर कोणाद्वारेही गैरवापर टाळण्यासाठी त्याला तुमच्या डीपीला देण्याअगोदर, न वापरलेल्या ओळी / जागांवर काट मारा.

g. तुमच्या डीपीकडे सोपविण्यापूर्वी इंस्ट्रक्शन स्लिप सर्व आवश्यक तपशिलांनी भरलेली आणि सर्व जॉइंट होल्डर्सची स्वाक्षरी केलेली असल्याची खात्री करा.

### 13. डिलिव्हरी इंस्ट्रक्शन स्लिपमध्ये दिलेली 'एग्झीक्यूशन डेट' काय आहे?

एग्झीक्यूशन डेट ही अशी तारीख असते, ज्या दिवशी सेक्युरिटीज तुमच्या खात्यातून वजा होतात. डिलिव्हरी इंस्ट्रक्शन स्लिपवर लिहिलेल्या एग्झीक्यूशन डेटला अंमलबजावणी झाल्याची खात्री करण्यासाठी, याला डीपीने डिपॉझिटरी सिस्टीममध्ये दाखल करणे आवश्यक असते. तुम्ही ज्या दिवशी तुमच्या खात्यातून सेक्युरिटीज वजा करू इच्छिता, त्याविषयी फार अगोदर सूचना देऊन ठेवू शकता (डीआयएसमध्ये उल्लेख केलेल्या एग्झीक्यूशन डेटला तुमच्या खात्यातून ते वजा होतील).

### 14. डिलिव्हरी इंस्ट्रक्शनमध्ये भविष्यातील एग्झीक्यूशन डेट दिल्याने मला काय फायदा मिळेल?

डिलिव्हरी इंस्ट्रक्शनमध्ये भविष्यातील एग्झीक्यूशन डेट दिल्याने वेळेच्या कमीमुळे सूचनेच्या अंमलबजावणीचा धोका किंवा अखेरच्या क्षणी घाई-गडबड टाळली जाऊ शकते. तुम्ही ही सुविधा शेअर्स इ. तुमच्या निवडलेल्या तारखेस बेनिफिशिअरीच्या खात्यात हस्तांतरणाच्या खात्रीसाठी वापरू शकता.

### 15. ऑफ मार्केट हस्तांतरणाच्या संदर्भात 'रिझन/ पर्पज' आणि 'कन्सीडरेशन' यांचा अर्थ काय आहे?

सेबीच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार, ज्या कारण किंवा हेतूसाठी ऑफ मार्केट हस्तांतरण केल्या गेले जाते आणि अशा हस्तांतरणासाठी केलेला विचार, अशा हस्तांतरणासाठी सादर केलेल्या डिलिव्हरी इंस्ट्रक्शन स्लिपवर याचा उल्लेख पाहिजे. डीआयएस पुस्तिकेत याकारणासाठी विविध 'रिझन/ पर्पज' यांचे पर्याय दिले आहेत. तुम्हाला योग्य असा पर्याय निवडायचा आहे आणि त्याचा डीआयएसवर उल्लेख करायचा आहे. जर हस्तांतरणाचे 'रिझन/ पर्पज' 'ऑफ मार्केट सेल' असेल, तर विचारात घेण्याच्या रकमेसोबत, तुम्हाला खालील तपशिलांचा देखील उल्लेख करावा लागेल -

a. भुगतान करण्याची तारीख

b. भुगतान प्रकार (रोख, धनादेश किंवा इलेक्ट्रॉनिक भरणा).

c. भुगतान धनादेश किंवा इलेक्ट्रॉनिक भरणामार्गे असेल, तर ट्रांसफरीचे नाव, बँक खाता क्रमांक, बँकेचे नाव, इलेक्ट्रॉनिक भरणांसाठी व्यवहाराचा संदर्भ क्रमांक किंवा धनादेशाद्वारे भरणासाठी धनादेश क्रमांक जरुरी असतो.

## सेक्युरिटीजचा संचार (ट्रांसमिशन)

### 1. डिमॅट खात्यांच्या संदर्भात ट्रांसमिशनचा अर्थ काय आहे?

ट्रांसमिशन कायद्याची अशी प्रक्रिया असते ज्याद्वारे एखाद्या मृत खातेधारकाचे सेक्युरिटीज जीवित असलेल्या जॉइंट धारका(कां)च्या/ कायदेशीर वारसाच्या/ मृत खातेधारकाच्या नामांकित व्यक्तीच्या नावावर हस्तांतरित होतात. डिमटेरियलाइझ स्वरूपातील धारणांच्या प्रकरणी ट्रांसमिशनची प्रक्रिया तुलनात्मकदृष्ट्या सोयीस्कर असते, कारण डिमॅट खात्यामध्ये असलेल्या सर्व सेक्युरिटीजसाठी ट्रांसमिशन औपचारिकता डीपीला आवश्यक कागदपत्रे सादर करून पूर्ण केली जाऊ शकते. या हेतूसाठी अनेक कंपन्यांची भेट घेण्याची गरज नसते, जशी कागदी स्वरूपातील सेक्युरिटीजसाठी जरुरी असते.
खातेधारकाच्या मृत्यूनंतर (एकमेव धारक किंवा जॉइंट धारक) ट्रांसमिशन कशा रीतीने होईल ते आकृती क्र. 6 मध्ये दाखविले आहे -

# ट्रांसमिशन

| प्रसंग | ट्रांसमिशन यांच्या नावाने | |
|---|---|---|
| | **नामांकन दिले आहे** | **नामांकन दिलेले नाही** |
| **एकमेव धारकाचा मृत्यू** | **ज्याचे नामांकन केलेले आहे ती / त्या व्यक्ती** | **कायदेशीर वारस (उत्तराधिकारी प्रमाणपत्र / मृत्युपत्रप्रमाण (प्रोबेट) / प्रबंधाधिकार पत्रानुसार)** |
| **जॉइंट धारकांपैकी एकाचा मृत्यू** | **हयात असलेले खातेदार** | **जीवित जॉइंट धारक (एक किंवा अनेक)** |
| **सर्व जॉइंट धारकांचा मृत्यू** | **ज्याचे नामांकन केलेले आहे ती / त्या व्यक्ती** | **कायदेशीर वारस (उत्तराधिकारी प्रमाणपत्र / मृत्युपत्रप्रमाण (प्रोबेट) / प्रबंधाधिकार पत्रानुसार)** |

**आकृती 6**

2. एकमेव खातेधारकाच्या मृत्युप्रसंगी, नामांकित व्यक्तीकडे सेक्युरिटीज ट्रांसमिशनची प्रक्रिया काय आहे?

एकमेव धारकाच्या मृत्युप्रसंगी, सेक्युरिटीजच्या ट्रांसमिशनसाठी, नामांकित व्यक्तीला एखाद्या नोटरी पब्लिक किंवा राजपत्रित अधिकाऱ्याद्वारा पूर्ण साक्षांकित मृत्यू प्रमाणपत्राच्या एका प्रतिसह पूर्ण भरलेला ट्रांसमिशन अर्ज सादर करण्याची गरज असेल. जर त्या दावेदाराचे त्याच सहभाग्यासह खाते नसेल, तर दावेदाराच्या खात्याच्या क्लायंट मास्टर रिपोर्टची (संबंधित डीपीद्वारा प्रमाणित) प्रत देखील जरुरी असेल. या कागदपत्रांच्या पडताळणीनंतर, डीपी त्या नामांकित व्यक्तीच्या डिमॅट खात्यामध्ये सेक्युरिटीज पाठवतील.

### 3. एकमेव धारक असलेल्या डिमॅट खात्यामध्ये नामांकित व्यक्ती नसल्यास काय होईल?

अशा प्रकरणी, सेक्युरिटीज कायदेशीर वारसा(सां)कडे हस्तांतरित होतील, जे सक्षम न्यायालयाच्या आदेशाद्वारे निर्धारित केले जाईल. यासाठी खालील कागदपत्रे आवश्यक असतील -

a. योग्यरीत्या भरलेला ट्रांसमिशन अर्ज.

b. नोटरी पब्लिक किंवा राजपत्रित अधिकाऱ्याद्वारा पूर्ण साक्षांकित मृत्यू प्रमाणपत्राची प्रत.

c. नोटरी पब्लिक किंवा राजपत्रित अधिकाऱ्याद्वारा पूर्ण साक्षांकित उत्तराधिकारी प्रमाणपत्राची एक प्रत किंवा

d. सक्षम अधिकारक्षेत्र असलेल्या न्यायालयाचा एखादा आदेश, जेथे मृत व्यक्तीने मृत्यूपत्र सोडलेले नाही किंवा

e. मृत्यूपत्राची प्रत किंवा

f. नोटरी पब्लिक किंवा राजपत्रित अधिकाऱ्याद्वारा पूर्ण साक्षांकित प्रबंधाधिकार पत्र.

g. जर दावेदाराचे त्याच सहभाग्यासह खाते नसेल, तर दावेदाराच्या खात्याच्या क्लायंट मास्टर रिपोर्टची (संबंधित डीपीद्वारा प्रमाणित) प्रत देखील जरुरी असेल.

तथापि, जर ट्रांसमिशन करावयाच्या सेक्युरिटीजचे मूल्य जर ₹ 5,00,000/- रुपयांपेक्षा कमी असेल (ट्रांसमिशन अर्जाच्या दिवशी), तर डीपी खालील कागदपत्रांच्या आधारावर विनंतीचे प्रक्रियण करू शकते.

a. पूर्ण भरलेला ट्रांसमिशन अर्ज.

b. नोटरी पब्लिक किंवा राजपत्रित अधिकाऱ्याद्वारा पूर्ण साक्षांकित मृत्यू प्रमाणपत्राची प्रत.

c. इंडेम्निटी पत्र (विहित प्रारुपात).

d. प्रतिज्ञापत्र (विहित प्रारुपात) आणि

e. विहित स्वरुपात ना हरकत प्रमाणपत्र किंवा फॅमिली सेटलमेंट डीड.

f. जर दावेदाराचे त्याच सहभाग्यासह खाते नसेल, तर दावेदाराच्या खात्याच्या क्लायंट मास्टर रिपोर्टची (संबंधित डीपीद्वारा प्रमाणित) प्रत देखील जरुरी असेल.

### 4. एक किंवा अधिक जॉइंट धारकांच्या मृत्यू प्रकरणी ट्रांसमिशन प्रक्रिया काय असते?

अशा प्रकरणी, सेक्युरिटीजवर नामांकन असले तरी देखील, जीवित धारकांकडे त्या सेक्युरिटीजचे हस्तांतरण होईल. उदा. जर खाते श्री. अ, श्री. ब आणि श्रीमती क यांच्या जॉइंट नावाने असेल, आणि श्री. ब च्या मृत्युच्या प्रसंगी सेक्युरिटीज जीवित धारकांकडे, म्हणजेच श्री. अ आणि श्रीमती क कडे हस्तांतरित होतील. जीवित धारकांना खालील कागदपत्रे डीपीकडे सादर करावी लागतील:

a. पूर्ण भरलेला ट्रांसमिशन अर्ज.

b. नोटरी पब्लिक किंवा राजपत्रित अधिकाऱ्याद्वारा पूर्ण साक्षांकित मृत्यू प्रमाणपत्राची प्रत.

वरील कागदपत्रांच्या पडताळणीनंतर आणि त्यांची संतुष्टी झाल्यानंतर, डीपी त्या सेक्युरिटीज जीवित धारका(कां)च्या खात्यामध्ये हस्तांतरित करेल आणि मृत व्यक्तीचे खाते बंद करेल.

### 5. ‘ट्रान्समिशन कम डिमॅट’ म्हणजे काय?

कागदी स्वरूपात उपलब्ध असलेल्या सेक्युरिटीज जेव्हा जॉईंट धारकांच्या नावावर असतात व त्यातील एका धारकाच्या (ज्याला सेक्युरिटीज कागदी स्वरूपात हवे होते) त्याचा मृत्यू होतो व उर्वरित धारका(कां)ना त्या त्यांच्या नावावर डिमॅट स्वरूपात हव्या असतील, तेव्हा ‘ट्रान्समिशन कम डिमॅट’ एक अत्यंत उपयुक्त सुविधा ठरते. या सुविधेच्या वापराने दोन उद्देश्य साध्य होतात, एका मृत जॉइंट धरकाचे नाव हटविले जाते आणि सेक्युरिटीजचे डिमटेरियलायझेशन, हे दोन्ही एकाच वेळी साध्य होतात. हे आकृती क्रमांक 7 द्वारा स्पष्ट केले आहे -

## ट्रांसमिशन कम डिमॅट सुविधा

| शेअर प्रमाणपत्र | प्रसंग | डिमॅट खाते |
|---|---|---|
| अ आणि ब<br>किंवा<br>ब आणि अ | एका धारकाचा मृत्यू - अ | ब |
| अ, ब आणि क (कोणत्याही क्रमाने) | दोन धारकांचा मृत्यू - अ आणि ब | क |

तुमच्या डीपीला मृत्यू प्रमाणपत्र(त्रे) आणि ट्रांसमिशन विनंतीसह डीआरएफ सादर करा.

**आकृती 7**

## नामांकन

1. 'नामांकन' म्हणजे काय?

नामांकन ही एक साधी प्रक्रिया आहे, ज्याद्वारे सेक्युरिटीजचा धारक त्याच्या / तिच्या मृत्यूनंतर या सेक्युरिटीज कोणाला मिळावेत यासाठी त्याची/ तिची पसंती कळवितो/ कळविते. डिमॅट खात्याच्या संदर्भात नामांकन प्रक्रिया डिमॅट खाते उघडण्याचा वेळी किंवा नंतर कधीही केली जाऊ शकते.

2. नामांकन कोण करू शकतो/ शकते?

नामांकन एकटे किंवा जॉइंटपणे डिमॅट खाते धारण करणाऱ्या व्यक्तींद्वारे केले जाऊ शकते. सोसायटी, ट्रस्ट, बॉडी कॉर्पोरेट, भागीदारी संस्था, हिंदू अविभाजित कुटुंबाचा कर्ता आणि वकीलपत्र धारक करणारा यांच्यासारखे व्यक्ती/ नॉन-इंडीविजुअल धारक नामांकन करू शकत नाहीत.

3. जॉइंट होल्डर नामांकन करू शकतात का?

होय. जॉइंट होल्डर असलेल्या खात्यांसाठी नामांकन करण्याची परवानगी असते. तथापि, कोणत्याही जॉइंट होल्डरच्या मृत्यू प्रसंगी, सेक्युरिटीज जीवित होल्डर्स कडे हस्तांतरित होतात. केवळ सर्व जॉइंट होल्डर्सच्या मृत्यू प्रसंगी, नामांकित व्यक्तीकडे (नामांकन केलेले असेल तर, अन्यथा कायदेशीर वारसाकडे जातील) सेक्युरिटीज हस्तांतरित होतील.

### 4. एनआरआय नामांकन करू शकतो/ शकते का?

होय, एनआरआय थेट नामांकन करू शकतो/ शकते. तथापि, एनआरआयच्या वतीने वकीलपत्रधारक नामांकन करू शकत नाही.

### 5. अल्पवयीन व्यक्ती नामांकन करू शकतो/ शकते काय?

नाही. अल्पवयीन थेट किंवा त्याच्या/ तिच्या पालकाच्या वतीने नामांकन करू शकत नाही.

### 6. नामांकित व्यक्ती कोण बनू शकते?

केवळ एखादी व्यक्तीच नामांकित व्यक्ती बनू शकते. सोसायटी, ट्रस्ट, बॉडी कॉर्पोरेट, भागीदारी संस्था, हिंदू अविभाजित कुटुंबाचा कर्ता यांच्यासारखी गैर-व्यक्ती किंवा एखादा वकीलपत्र धारक डिमॅट खात्यासाठी नामांकित व्यक्ती बनू शकत नाही.

### 7. एकापेक्षा जास्त नामांकित व्यक्ती असू शकतात काय?

होय, आता एका डिमॅट खात्यासाठी जास्तीत जास्त तीन नामांकने केली जाऊ शकतात. जर, दोन किंवा अधिक नामांकित व्यक्तींचा उल्लेख असल्यास, त्या खातेधारकाच्या मृत्युच्या प्रकरणी, विविध सेक्युरिटीजचे वाटप करण्यास इच्छुक असलेल्या टक्केवारीचा (%) देखील उल्लेख करणे आवश्यक असेल.

### 8. एखादी अल्पवयीन व्यक्ती नामांकित व्यक्ती असू शकते काय?

होय, एक अल्पवयीन व्यक्ती नामांकित व्यक्ती असू शकते. जेव्हा डिमॅट खात्यात एखाद्या अल्पवयीन नामांकित व्यक्तीचा उल्लेख केला जातो, तेव्हा त्याच्या / तिच्या पालकाचे तपशील देखील दिले पाहिजेत.

9. डिमॅट खात्यामध्ये असलेल्या प्रत्येक सेक्युरिटीजसाठी वेगवेगळी नामांकने केली जाऊ शकतात काय?

नाही. नामांकने खातेनिहाय केली जाऊ शकतात आणि सेक्युरिटीजनिहाय केली जात नाहीत. याचा अर्थ, खातेधारकाच्या मृत्यूप्रसंगी त्या डिमॅट खात्यामध्ये असलेले सर्व सेक्युरिटीज आधी नोंदणी केलेल्या प्रपोर्शनमध्ये नामांकित व्यक्ती(क्तीं)कडे हस्तांतरित करण्यासाठी पात्र असतात. तुम्हाला जर विभिन्न सेक्युरिटीजसाठी विभिन्न नामांकित व्यक्ती ठेवायच्या असतील, तर तुम्ही विभिन्न डिमॅट खात्यांमध्ये सेक्युरिटीज ठेवण्याचा विचार करू शकता आणि तुमच्या निवडीप्रमाणे नामांकित व्यक्ती(क्तीं)चा उल्लेख करू शकता.

10. एनआरआय नामांकित व्यक्ती बनू शकतो/ शकते का?

होय. लागू असलेल्या विदेशी चलन विनिमयाच्या तरतुदींच्या अधीन राहून एखाद्या डिमॅट खात्यामध्ये एनआरआय एक नामांकित व्यक्ती असू शकते.

11. नामांकित व्यक्तीच्या नियुक्तीसाठी काय प्रक्रिया आहे?

डिमॅट खातेधारकांनी खाते उघडण्याच्या वेळी अर्जामध्ये नामांकित व्यक्ती(क्तीं)शी संबंधित माहितीचा उल्लेख करणे आवश्यक असते. एका डिमॅट खात्यामध्ये नामांकित व्यक्ती म्हणून जास्तीत जास्त तीन विभिन्न व्यक्तींचा उल्लेख केला जाऊ शकतो.

जर, खाते उघडण्याच्या वेळी नामांकन केले नसेल किंवा असेल, पण खातेधारकाला(कांना) नंतर कोणत्याही वेळी त्यात बदल करावयाचा असेल, तर एक ‘नामांकन’ अर्ज भरून डीपीकडे द्यावा लागेल.

12. नामांकित व्यक्ती बदलली जाऊ शकते काय?

होय, केवळ एक नामांकन अर्ज भरून आणि पुन्हा एकदा डीपीला सोपवून नामांकित व्यक्ती कोणत्याही वेळी खातेधारका(कां)द्वारा बदलली जाऊ शकते.

13. डिमॅट खात्यामध्ये नामांकित व्यक्ती असणे गरजेचे आहे काय?

डिमॅट खात्यासाठी नामांकन अनिवार्य नाही. तथापि, त्या डिमॅट खात्यामध्ये नामांकित व्यक्ती ठेवण्याची शिफारस केली जाते. एकमेव खातेधारकाच्या दुर्दैवी मृत्यूप्रकरणी, नामांकन केल्यामुळे ट्रान्समिशन प्रक्रिया अत्यंत सुलभ आणि जलद होते. तुम्हाला खाते उघडण्याच्या वेळी कोणत्याही नामांकनाचा उल्लेख करावयाचा नसेल, तर तुम्ही “आय/ वी डू नॉट विश टू मेक नॉमिनेशन’ असे कळवावे लागते.

## सेक्युरिटीज प्लेजिंग आणि हायपोथीकेशन

1. प्लेजिंग ऑफ शेअर्स याचा अर्थ काय?

प्लेजिंग म्हणजे प्रामुख्याने एखाद्या व्यक्तीकडे असलेले शेअर्स (प्लेजर) दुसऱ्या व्यक्तीच्या नावाने (प्लेजी) सेक्युरिटीज किंवा कोलॅटरल म्हणून प्लेजीने दिलेल्या एक्स्पोजरसाठी देण्यास स्वीकृती देणे असते. सामान्यपणे, संबंधित शेअरहोल्डरद्वारा शेअर्सच्या गहाण ठेवून कर्ज घेण्यासाठी शेअर्स प्लेजिंग केले जाते.

2. मला माझ्या बँकेद्वारा दिल्या जाणाऱ्या सेक्युरिटीजच्या बदल्यात कर्ज देण्याच्या सुविधेचा लाभ घेण्यासाठी माझ्या डिमॅट खात्यामध्ये असलेल्या शेअर्सला प्लेज करायचे असल्यास मी काय करावे?

प्रक्रिया खालीलप्रमाणे आहे:

a. कर्जाची रक्कम, कालावधी, व्याज दर आणि तारण म्हणून प्रस्तुत केल्या जाणाऱ्या सेक्युरिटीजचे प्रकार, इ. बद्दल बँकेसोबत एक व्यवहार करावा लागेल. अशा

व्यवहाराचा व्यापारी उद्देश एकमेकांमधील वाटाघाटींच्या अधीन असतील आणि त्यामुळे डिपॉझिटरीच्या कक्षेबाहेर असतील.

b. दोघांचा म्हणजे तुम्ही (प्लेजर) आणि बँक/ कर्ज देणारे (प्लेजी) एकाच डिपॉझिटरीकडे (एकाच किंवा भिन्न डीपी असलेल्या) डिमॅट खाते असणे आवश्यक आहे.

c. तुम्ही एक प्लेजर या नात्याने पूर्ण भरलेली 'प्लेज इनिशियेशन इंस्ट्रक्शन स्लिप' तुमच्या डीपीला सादर करून प्लेजिंगची प्रक्रिया सुरु करू शकता.

d. एकदा तुमच्या डीपीने तुमच्या सुचनेवर प्रक्रिया सुरु केली, की त्या बँकेच्या / लेंडरच्या (प्लेजीच्या) डीपीद्वारे तपशील पाहिले (शोधले) जाऊ शकतात. नंतर प्लेजीला त्याच्या डीपीला पूर्ण भरलेली 'प्लेज कन्फर्मेशन इंस्ट्रक्शन स्लिप' देण्याची गरज असते. (पर्यायाने, प्लेजर त्याच्या डिमॅट खात्यामध्ये ऑटोमॅटिक प्लेज कन्फर्मेशन सुविधेचा पर्याय स्वीकारू शकतो/ शकते). अशा सूचनेच्या अंमलबजावणीवर, डिपॉझिटरी सिस्टीममध्ये प्लेजी बनविले जाईल.

### 3. सेक्युरिटीजवर प्लेज बनविण्याचे परिणाम काय आहेत?

डिपॉझिटरी सिस्टीममध्ये एकदा प्लेज सूचनेची पुष्टी झाली, की प्लेजरच्या डिमॅट खात्यामध्ये त्या सेक्युरिटीजला ब्लॉक केले जाते. ते ब्लॉक असेपर्यंत प्लेजरच्या खात्यातून त्या सेक्युरिटीजचा निपटारा करण्याचा पर्याय काढल्या जाईल.

4. घेतलेल्या कर्जाची परतफेड केल्यानंतर, मी माझे प्लेज माझ्या डिमॅट खात्यामध्ये फ्री बॅलेंस म्हणून कसे परत मिळवावेत?

कर्जाची परतफेड केल्यानंतर, प्लेजर पूर्ण भरलेला 'प्लेज क्लोजर इनिशियेशन इंस्ट्रक्शन' फॉर्म सादर करू शकतो/ शकते. एकदा अंमलबजावणी झाली, की मग ती माहिती त्या प्लेजीच्या डीपीकडे पाठविली जाते. नंतर प्लेजी 'प्लेज क्लोजर इनिशियेशन इंस्ट्रक्शन' त्याच्या डीपीकडे सादर करू शकतो (पर्यायाने, प्लेजी प्लेजरकडून अर्ज मिळण्याआधीच, त्याच्या डीपीला प्लेज बंद करण्याची सूचना देऊ शकतो/ शकते).

एकदा तारण बंद झाले, की मग त्या सेक्युरिटीजच्या अंतर्गत झालेला ब्लॉक हटविला जातो आणि ते अगोदरच्या तारणकाराला पुन्हा व्यवहारासाठी उपलब्ध राहतात.

5. प्लेज म्हणून दिलेल्या एखाद्या शेअरला मी बदलू शकतो/ शकते का?

होय, जर प्लेजीने (लेंडर) मंजुरी दिली, तर तुम्ही प्लेज म्हणून दिलेल्या एखाद्या शेअरला बदलू शकता. यासाठी, प्लेजरला प्लेजच्या निर्मितीसाठी नवीन अर्ज द्यावा लागेल आणि आधीचे तारण बंद करावे लागतील.

6. प्लेज ठेवलेल्या सेक्युरिटीजवरील डीवीडंड कोणाला मिळेल?

प्लेजच्या कालावधीत सेक्युरिटीजचा लाभार्थी हा प्लेजरच असतो. त्यामुळे, प्लेजच्या कालावधीत त्या कंपनीद्वारा घोषित कॉर्पोरेट फायदे प्लेजरलाच मिळतील.

7. प्लेज ठेवलेल्या शेअर्ससाठी मिळालेल्या बोनस शेअर्सच्या वाटपाचे काय होईल?

नोंदीच्या दिवशी जर शेअर प्लेज अवस्थेत असतील, तर बोनस शेअर्स प्लेजरच्या खात्यात प्लेजीच्या नावे चिन्हांकित केलेल्या शेअर्ससोबत जमा होतील. नंतर, जेव्हा प्लेज बंद होईल, तेव्हा सर्व शेअर्स (बोनससहित) प्लेजरच्या खात्यात फ्री बॅलेंस म्हणून जमा केल्या जातील. इन्व्होकेशनच्या प्रसंगी, सर्व शेअर्स (बोनससहित) प्लेजीच्या खात्यात जातील.

## 8. डिजिटल एलएएस सुविधा म्हणजे काय?

डिजिटल एलएएस (लोन अगेन्स्ट शेअर्स) एक अशी सुविधा असते, जी एनएसडीएलद्वारे पुरविली जाते ज्यात शेअर्स गहाण ठेवून ऑनलाईन कर्ज घेतले ज्याण्याची प्रक्रिया होते. या सुविधेचा वापर करून एक डिमॅट खातेधारक डिमॅट खात्यामध्ये असलेल्या पात्र सेक्युरिटीज लेंडिंग बँकेच्या नावे प्लेज ठेवून त्यावर कर्ज मिळवू शकतो/ शकते. यावरील अधिक माहितीसाठी, तुम्ही एखाद्या सहभागी बँकेमध्ये चौकशी करू शकता.

## 9. प्लेजिंग आणि हायपोथीकेशन यांच्यामध्ये काय फरक आहे?

डिपॉझिटरी सिस्टीममध्ये, प्लेजिंग आणि हायपोथीकेशन यामध्ये काहीही फरक नाही फक्त प्लेजवर लेंडरद्वारे (प्लेजी) आवाहन केले जाऊ शकते. जेथे, हायपोथीकेशनच्या

संदर्भात, इन्व्होकेशन घडण्यासाठी, कर्जदाराच्या (हायपोथीकेटर) संमतीची आवश्यकता असते.

## सेक्युरिटीज उधार देणे आणि उधार घेणे

### 1. सेक्युरिटीज उधार देणे आणि उधार घेणे याचा काय अर्थ आहे? हे कसे काम करते?

सेक्युरिटीज लेंडिंग अँड बॉरोइंग स्कीम (एसएलबीएस) एक तंत्र आहे, ज्याद्वारे शॉर्ट सेलर्स स्टॉक एक्स्चेंजच्या प्लॅटफॉर्मवर त्यांच्या डिलिव्हरीच्या दायित्त्वांना पूर्ण करण्यासाठी किंवा कोलॅटरल म्हणून आवश्यक सेक्युरिटीज उधार घेऊ शकतात. ही योजना ‘क्लियरिंग कॉर्पोरेशन्स’ द्वारा पुरविली जाते ज्या ‘मंजूर मध्यस्थ’ म्हणून नोंदणीकृत असतात.

जे स्टॉकब्रोकर्स मंजूर मध्यस्थांकडे स्वतःची ‘पार्टीसिपंट’ म्हणून नोंदणी करतात, ते त्यांच्या स्वतःच्या खात्यासाठी किंवा त्यांच्या ग्राहकांच्या वतीने एसएलबीएसमध्ये सहभागी होऊ शकतात. रिटेल गुंतवणूकदार या योजनेत त्यांच्या स्टॉकब्रोकरद्वारा एक लेंडर किंवा बॉरोअर म्हणून योजनेत सहभागी होऊ शकतात. उधार देणे आणि उधार घेणे हे डिपॉझिटरी सिस्टीमद्वारे टी+1 सेटलमेंटच्या आधारावरून प्रस्थापित होतात. एसएलबीएस केवळ डिमटेरियलाइझ्ड स्वरूपात केले जाऊ शकते.

### 2. सेक्युरिटीज उधार देण्याचे आणि घेण्याचे काय फायदे आहेत?

एसएलबीएस एक मार्केट आधारित यंत्रणा आहे, जी सेक्युरिटीजच्या तात्पुरत्या गरजा भागविण्यात मदत करते. शॉर्ट सेलर्स बाजारातून या सेक्युरिटीज उधार घेऊन त्यांच्या डिलिव्हरीचे दायित्त्व किंवा कोलॅटरलच्या गरजा भागवू शकतात. दुसरीकडे उधार देणारे त्यांच्या पोर्टफोलियोमध्ये निष्क्रिय असलेल्या सेक्युरिटीज उधार देऊन उधार शुल्क कमवू शकतात.

### 3. माझ्या खात्यात पडून असलेल्या सेक्युरिटीज मी उधार देऊ शकतो/ शकते काय?

होय. तुम्ही तुमच्या सेक्युरिटीज तुमच्या स्टॉकब्रोकरद्वारा उधार देऊ शकता, ज्याने स्वतःला ‘पार्टीसिपंट’ म्हणून ‘मंजूर मध्यस्थ’ (क्लियरिंग कॉर्पोरेशन) कडे नोंदणी केली आहे. तुम्हाला तुमच्या स्टॉकब्रोकरसह एक प्रमाणित करार करावा लागेल.

4. या सेक्युरिटीज किती कालावधीसाठी उधार घेता किंवा देता येऊ शकतात?

सेक्युरिटीज उधार घेणे किंवा देणे याचा कालावधी 1 ते 12 महिन्यांचा असतो. तथापि, उधार देणाऱ्या आणि घेणाऱ्यांना अनुक्रमे वेळे अगोदर सेक्युरिटीज मागण्याचा आणि लवकर परत करण्याचा पर्याय असतो.

5. उधार घेण्यासाठी आणि देण्यासाठी कोणत्याही सेक्युरिटीज वापरल्या जाऊ शकतात का?

नाही. स्टॉक एक्स्चेंजच्या फ्युचर्स आणि ऑप्शन प्रकारात खरेदी-विक्रीसाठी उपलब्ध असलेल्या सेक्युरिटीज सध्या उधार देण्यासाठी आणि घेण्यासाठी उपलब्ध आहेत. एसएलबीएसच्या अंतर्गत उपलब्ध सेक्युरिटीजची यादी संबंधित मंजूर मध्यस्थांद्वारा अधूनमधून घोषित केली जाते.

6. माझ्या डिमॅट खात्यामध्ये पडून असलेल्या सेक्युरिटीज मी कशा उधार देऊ शकतो/ शकते?

तुम्ही सेक्युरिटीज उधार देण्यासाठी तुमच्या ब्रोकरकडे ऑर्डर देऊ शकता. तुमचा ब्रोकर स्टॉक एक्स्चेंजच्या प्लॅटफॉर्मवर ते ऑर्डर दाखल करेल. त्या ऑर्डरच्या सफलतापूर्वक अंमलबजावणीनंतर, तुम्हाला तुमच्या ब्रोकरला पे-इनसाठी डिलिव्हरी इंस्ट्रक्शन स्लिप देण्याची गरज असेल.

7. मी उधार दिलेल्या सेक्युरिटीज परत कशा मिळवू शकतो/ शकते?

सेक्युरिटीज उधार घेणारा उधार देण्याच्या स्वीकृत कालावधीच्या अखेरीस किंवा आधी (जर त्या सेक्युरिटीजसाठी व्यवहारास अगोदर संपविण्याची मंजूरी मध्यस्थीनी दिली असेल) त्या परत देऊ शकतो. परत केल्यानंतर, सेक्युरिटीज तुमच्या ब्रोकरद्वारा किंवा क्लियरिंग कॉर्पोरेशनद्वारा थेट तुमच्या डिमॅट खात्यात जमा होतील.

8. उधार दिलेल्या कालावधीत सेक्युरिटीजवरील कॉर्पोरेट फायदे मला कसे मिळू शकतील?

ज्या सेक्युरिटीजवर कॉर्पोरेट प्रक्रिया होणार असतील, ते कॉर्पोरेट प्रक्रियेच्या प्रकारच्या आधारावर व्यवहाराच्या समयपूर्व समाप्ती किंवा अनुकूलनाच्या अधीन असतील. डीवीडंड

आणि स्टॉक-स्प्लिट वगळता इतर कॉर्पोरेट प्रक्रियेच्या प्रकरणी सर्व व्यवहार अगोदरच्या तारखेस बंद केले जातील. डीवीडंडच्या प्रकरणी त्या उधार घेणाऱ्याकडून क्लियरिंग कॉर्पोरेशन रक्कम गोळा करून उधार देणाऱ्याला देईल. स्टॉक-स्प्लिटच्या प्रकरणी, त्या उधार घेणाऱ्याची स्थिती त्या अनुपातात समायोजित केली जाईल आणि उधार देणाऱ्याला रिव्हर्स लेग सेटलमेंट तारखेस सुधारित संख्या मिळेल.

9. सेक्युरिटीजच्या माझ्या तात्पुरत्या गरजा भागविण्यासाठी मी कशा रितीने उधार घेऊ शकतो/ शकते?

तुम्ही तुमच्या ब्रोकरकडे तुमची ऑर्डर देऊ शकता, ज्यात आवश्यक सेक्युरिटीजचे नाव, संख्या आणि उधारीचा कालावधी यांच्यासारखे तपशील देऊ शकता. तुमचा ब्रोकर एक्स्चेंज प्लॅटफॉर्मवर तुमची ऑर्डर दाखल करेल. पे-आउट मिळाल्यानंतर, तुमचा ब्रोकर तुमच्या डिमॅट खात्यात सेक्युरिटीज जमा करण्याची व्यवस्था करेल. त्या कालावधीच्या अखेरीस (किंवा त्याच्या अगोदर, जर तुम्हाला वाटल्यास किंवा मंजूर मध्यस्थीची अनुमती असेल तर) उधार घेतलेल्या सेक्युरिटीज तुम्हाला परत कराव्या लागतील.

## डिमॅट खात्यासाठी पॉवर ऑफ अॅटर्नीचा वापर

1. माझ्या वतीने अन्य कोणी माझ्या डिमॅट खात्याला चालवू शकतो/ शकते का?

होय. तुम्ही एखाद्या व्यक्तीला त्याच्या / तिच्या नावाने पॉवर ऑफ अॅटर्नीच्या अंमलबजावणीद्वारा तुमचे डिमॅट खाते चालविण्यासाठी अधिकृत करू शकता आणि ती व्यक्ती तुमच्या वतीने खाते चालवू शकेल असे डीपीला सादर करू शकता. ते डिमॅट खाते, खातेधारक तसेच पीओएधारक दोघेही चालवू शकतात.

2. माझ्या ब्रोकर / डीपीला पीओए देणे गरजेचे असते काय?

नाही, पीओए देणे अनिवार्य नसते. आपल्या सेवा पुरविण्यासाठी कोणताही ब्रोकर किंवा डीपी यासाठी आग्रह करू शकत नाही. परंतु, तुमच्या ब्रोकरने दिलेल्या ऑनलाईन ट्रेडिंग सुविधेचा पर्याय तुम्हाला स्वीकारायचा असेल, तर सेबीच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार तो ब्रोकर तुम्हाला त्याच्या नावावर पीओए देण्यास सांगू शकतो.

3. जर मला एखाद्याला पीओए द्यावयाचा असेल तर मी कोणत्या खबरदाऱ्या घेतल्या पाहिजेत?

सर्वप्रथम, तुम्ही पीओए देण्याच्या गरजेवर स्वतःचे समाधान केले पाहिजे. जर तुम्हाला तुमच्या डीपीला डीआयएस देण्यात अडचण येत असेल, तर तुम्ही स्पीड-ई सुविधा वापरण्याचा विचार करू शकता.

जर तुम्ही एखाद्याला पीओए देण्याचा निर्णय घेतला, तर त्याचा मसुदा केवळ इच्छित हेतुंसाठी आवश्यक अधिकार देण्यासाठीचा बनविल्याची खात्री करा. सर्वसाधारण पॉवर ऑफ अ‍ॅटर्नी टाळणे अधिक चांगले होईल. पुढे, सेबीच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार, स्टॉकब्रोकर्सना दिलेले पीओए केवळ ग्राहकाच्या सूचनांनुसार हाती घेतलेल्या खरेदी-विक्रीपासून उत्पन्न दायित्वांचे निपटारे भागाविण्यासाठी केले जाऊ शकतात.

4. मी माझ्या ब्रोकरच्या नावाने पीओए दिला होता. आता त्याने ते यापुढे वापरू नये अशी माझी इच्छा आहे. मी काय करावे?

तुमच्या इच्छेबद्दल तुमच्या ब्रोकरला कळविण्यासोबत, तुम्हाला त्या ब्रोकरच्या नावाने दिलेल्या पीओएला रद्द केल्याचे सांगणारा एक अर्ज तुमच्या डीपीला द्यावा लागेल. जॉइंट खातेधारका(कां)च्या प्रकरणी, सर्व खातेधारकांना अशा अर्जावर स्वाक्षरी करणे गरजेचे असेल.

## एनएसडीएलच्या ई-सेवा

तंत्रज्ञानात होणाऱ्या विकासात्मक घडामोडींच्या आधारावर, एनएसडीएल निरंतरपणे नाविन्यपूर्ण गोष्टी करत आहे आणि अधिकाधिक डिपॉझिटरी सेवा ऑनलाईन उपलब्ध करत आहे. यांच्यापैकी काहींचे वर्णन खाली केले आहे -

### स्पीड-ई

स्पीड-ई (ज्याचे संबोधन स्पीडी असे केले जाते) ही एनएसडीएलद्वारा पुरविली जाणारी इंटरनेटवर आधारित एक सुविधा आहे. हे डिमॅट खातेधारकाला डिलिव्हरी, प्लेज आणि म्युच्युअल फंडच्या रिडम्पशनशी संबंधित सूचना इलेक्ट्रॉनिक स्वरूपात देण्यास सक्षम बनविते, ज्यामुळे प्रक्रिया अतिशय जलद, सुरक्षित आणि कार्यक्षम बनते. ही सुविधा कम्प्युटर्सवर (डेस्कटॉप/ लॅपटॉप) उपलब्ध आहे आणि पासवर्ड वापरकर्ते याला मोबाईल फोनवर देखील ॲक्सेस करू शकतात. जर डिमॅट खातेधारकाचा डीपी ही सेवा देत असेल तर तो/ ती ही सुविधा प्राप्त करू शकतो/ शकते. ही सेवा उपलब्ध असणाऱ्या डीपीजची यादी यात दिली आहे https://nsdl.co.in/speede-dps.php.

1. मी स्पीड-ई सुविधा कशी वापरू शकतो/ शकते?

ही सेवा असे डिमॅट खातेधारक वापरू शकतात ज्यांनी या हेतूसाठी आपल्या नावांची नोंदणी केली असेल. तुमचे डीपी या सुविधेसाठी नोंदणी करण्यात मदत करतील. सफल नोंदणीनंतर, तुम्ही ऑनलाईन सूचना देऊ शकता आणि अशा सूचनांच्या स्थितीवर लक्ष ठेवू शकता. तुम्हाला प्रत्यक्ष सूचना स्लिप्स भरून तुमच्या डीपीला देण्याची गरज पडणार नाही. अधिक माहिती आणि नोंदणीसाठी, कृपया भेट द्या https://eservices.nsdl.com/.

2. जर मी एक स्पीड-ई वापरकर्ता असेल, तर मी माझ्या पसंतीच्या कोणत्याही खात्यात सेक्युरिटीज हस्तांतरित करू शकतो/ शकते काय?

स्पीड-ई प्लॅटफॉर्मवर सादर केल्या जाणाऱ्या डिलिव्हरी सूचना, तुम्ही कोणत्या प्रकारचा एक्सेस इच्छिता याच्यावर अवलंबून असते. यात दोन प्रकारचे विकल्प उपलब्ध असतात - पासवर्ड युजर आणि ई-टोकन युजर.

पासवर्ड युजर पासवर्डसह लॉगीन करतात आणि ते त्याच्या/ तिच्या निवडीच्या केवळ सहा आधी रजिस्टर केलेल्या (प्री-स्पेसीफाइड) ब्रोकर खात्यांमध्ये सेक्युरिटीज हस्तांतरित करू शकतात. ई-टोकन युजर ई-टोकनच्या सहाय्याने लॉगीन करतात आणि त्याच्या/ तिच्या निवडीच्या कोणत्याही डिमॅट खात्यामध्ये सेक्युरिटीज हस्तांतरित करू शकतात.

3. स्पीड-ई सुविधेच्या ई-टोकन वापरकर्त्यांसाठी आणखी कोणतेही लाभ आहेत काय?

स्पीड-ई सुविधेतील ई-टोकनचे अतिरिक्त फायदे खालीलप्रमाणे आहेत:

a. मल्टीपल अधिकार-पत्रांची सुविधा, म्हणजेच जॉइंट धारकांद्वारा सूचनेचा अधिकार.

b. तुम्ही तुमचे डिमॅट खाते फ्रीज करू शकता (पूर्णपणे किंवा आंशिक स्वरूपात). जर खाते स्पीड-ई वापरकर्त्याने फ्रीज केले असेल, तर त्याला केवळ स्पीड-ई वापरकर्ता अनफ्रीज करू शकतो/ शकते. त्यामुळे, तुम्ही तुमच्या इच्छेनुसार डिलिव्हरी सूचना देऊ शकता आणि सेक्युरिटीज हस्तांतरित करू शकता, खाते जेव्हा वापरायचे असेल तेव्हाच लॉक आणि अनलॉक करा, म्हणजेच तुमच्या खात्याचे संपूर्ण नियंत्रण तुमच्या हातात असते.

### 4. स्पीड-ईचे पासवर्ड वापरकर्ते प्री-नोटीफाईड ब्रोकर खाती बदलू शकतात काय?

होय, प्री-नोटीफाईड ब्रोकरचे खाते, ज्यात पासवर्डच्या वापरकर्त्यांसाठी सेक्युरिटीजचे हस्तांतरण करण्याची अनुमती असते, आणि डीपीला पूर्वसूचना देऊन ते बदलले जाऊ शकते. हे बदल तुमच्या डीपीकडून ऑथोरायझेशन प्राप्त झाल्यानंतर लागू होतात.

## आयडियाज (IDeAS)

इंटरनेट बेस्ड डिमॅट अकाऊंट स्टेटमेंट (आयडियाज) डिमॅट खातेधारकांसाठी डिमॅट खात्यामध्ये घडणाऱ्या व्यवहारांना पाहण्यासाठी इंटरनेट आधारित एक सुविधा आहे. हे खातेधारकांना संबंधित मुल्यांकनासहित खात्यातील शिल्लक पाहण्यासाठी सक्षम बनविते. खातेधारक मागील 12 महिन्यांसाठी व्यवहारांचे महिन्यानुसार स्टेटमेंट पाहू/ डाऊनलोड करू शकतात. तुम्ही जर ही सुविधा वापरत नसाल, तर तुम्ही याच्या नोंदणीसाठी तुमच्या डीपीला विनंती करू शकता किंवा https://eservices.nsdl.com/ या संकेतस्थळावर हे स्वतः ऑनलाईन करू शकता. ही सुविधा खातेधारकांसाठी पूर्णपणे मोफत आहे.

## एनएसडीएल मोबाईल ॲप

एनएसडीएलने डिमॅट खातेधारकांसाठी एक अत्यंत उपयुक्त अशी मोबाईल ॲप प्रणाली बनवली आहे. या ॲपला तुम्ही गुगल प्ले स्टोर किंवा ॲप स्टोरमधून डाऊनलोड करू शकता. ही ॲप एकाच साइन-ऑनमध्ये बॅलेंस तपासण्यासाठी आणि एनएसडीएल इ-व्होटिंग सिस्टीम ऑनलाईन वापरण्यासाठी उपयोगात आणली जाऊ शकते. ही ॲप खातेधारकांसाठी पूर्णपणे मोफत आहे.

## ई-व्होटिंग

एनएसडीएल इलेक्ट्रॉनिक व्होटिंग (ई-व्होटिंग) प्लॅटफॉर्म प्रत्येक शेअरहोल्डरला कंपनीच्या वार्षिक तसेच इतर बैठकीच्या स्थानी प्रत्यक्ष उपस्थित न राहता ऑनलाईन मतदानाचे हक्क बजावण्याची सुविधा देते. ई-व्होटिंग सेवा स्पीड-ई तसेच एनएसडीएल मोबाईल ॲप यांच्यासोबत संलग्न करण्यात आली आहे. अधिक माहितीसाठी कृपया https://www.evoting.nsdl.com/ वर भेट द्या.

## एनएसडीएलकडून इतर उपयुक्त सेवा

## एनएसडीएल कंसॉलिडेटेड अकाउंट स्टेटमेंट

एनएसडीएल प्रत्येक डिमॅट खातेधारकाला त्याच्या/ तिच्या डिमॅट खात्या(त्यां)साठी आणि म्युच्युअल फंड गुंतवणुकीसाठी खात्याच्या विवरणपत्राच्या स्वरूपात कंसॉलिडेटेड अकाऊंट स्टेटमेंट (सीएएस) पाठविते. हे होल्डिंग पहिल्या धारकाच्या पॅनच्या अनुसार जोडलेले असतात.

a. हे विवरणपत्र महिन्यात व्यवहार झाला असल्यास दर महिन्यास पाठविले जाते. तुम्ही जर तुमचा इमेल आयडी आणि तुमच्या डीपीची संमती दिलेली असेल, तर तुम्हाला ई-मेलद्वारा स्टेटमेंट पाठविले जाईल.

b. स्टेटमेंट तुमच्या प्रत्येक गुंतवणुकीची किंमत, एकंदर पोर्टफोलियोचे मूल्य आणि त्या कालावधीत एकूण पोर्टफोलियोमधील बदल दर्शविणारा आलेख देखील दर्शविते.

c. तसेच, यात तुमचे केवायसी अद्ययावत आहे का, म्युच्युअल फंड फोलियोज, इ. मध्ये उल्लेखित इमेल आयडी आणि मोबाईल क्रमांक यांच्यासारखे इतर तपशील देखील दर्शविले जातात. जर तुम्हाला कोणतीही तफावत आढळली किंवा एखाद्या अपडेटची गरज असेल, तर तुम्ही म्युच्युअल फंड कंपनी किंवा तिच्या रजिस्ट्रारशी संपर्क साधू शकता.

d. जर तुम्हाला स्टेटमेंट मिळाले नाही किंवा तुम्हाला या विवरण पत्रात कोणतीही तफावत आढळली, तर कृपया तुमच्या डीपीशी त्वरित संपर्क साधा किंवा NSDL-CASfeedback@nsdl.co.in वर इमेल करा.

तुम्ही तुमच्या सर्व डिमॅट खात्यांमधील आणि म्युच्युअल फंड फोलियोजमधील विवरण पत्राचा कालावधी आणि क्लोजिंग बॅलेंस तपासले पाहिजे.

एनएसडीएलने https://nsdlcas.nsdl.com/ येथे एक ऑनलाईन सुविधा बनविली आहे, ज्यात एनएसडीएलला थेट इमेल आयडी पुरवून खातेधारकाला एनएसडीएलकडून ई-मेल (ई-

सीएएस) द्वारा सीएएस मिळविण्यासाठी सक्षम बनवते. ही सुविधा ई-सीएएस मिळविण्यासाठी ईमेल आयडी बदलण्यासाठी देखील वापरली जाऊ शकते.

## एसएमएस अलर्ट सुविधा

### 1. एसएमएस अलर्ट सुविधा काय आहे?

एनएसडीएल खातेधारकांना डिमॅट खात्यामधील त्यांच्या नोंदणीकृत मोबाईल नंबरवर संदेश पाठवीत त्यांच्या खात्यात घडणाऱ्या महत्त्वाच्या व्यवहारांवर लक्ष ठेवण्यात मदत करते. संदेश एनएसडीएलद्वारा थेट पाठविलेले असल्यामुळे, ते डिमॅट खात्याच्या खऱ्या स्थितीस दर्शवितात. ही सुविधा डिमॅट खाते धारकांसाठी पूर्णपणे मोफत आहे.

### 2. मी एसएमएस अलर्ट सुविधेसाठी नोंदणी कशी करू शकतो?

जर तुम्ही ही सुविधा आधीपासून वापरत नसाल, तर तुम्ही केवळ तुमच्या मोबाईल क्रमांकाचा उल्लेख करून तुमच्या डीपीला एक लिखित विनंती पाठवून नोंदणी करू शकता. तुमच्या मोबाईल क्रमांकाची सफलतापूर्वक नोंद झाल्यावर आणि तुमच्या डीपीद्वारा डिपॉझिटरी सिस्टीममध्ये एसएमएस मिळण्यासाठी एसएमएस फ्लॅग सक्षम झाल्यानंतर तुम्हाला संदेश मिळणे सुरु होईल.

असे खातेधारक, ज्यांना त्यांचा मोबाईल क्रमांक डीपीकडे नोंदविण्याची इच्छा असेल, परंतु ही सुविधा नको असेल, ते त्यांच्या डीपीला अशा खात्यांसाठी पुरविल्या जाणाऱ्या एसएमएस फ्लॅगना असक्षम करण्यास सूचित करू शकतात, पॉवर ऑफ ॲटर्नीद्वारा चालवली जात असलेली व बेसिक सर्विस डिमॅट खातीधारक अशी सूचना देऊ शकत नाहीत.

### 3. कोणत्या व्यवहारांसाठी एसएमएस संदेश पाठविले जातात?

तुम्हाला थेट एनएसडीएलकडून खालील बाबींसाठी एसएमएस मिळतील -

a. सर्व डेबिट ट्रान्सफर्स

b. आयपीओ, सब-डिव्हिजन आणि बोनससाठी झालेले क्रेडिट्स

c. फेल्युअर इंस्ट्रक्शन

d. ओव्हरड्यू इंस्ट्रक्शन

e. मोबाईल क्रमांकात बदल

f. पत्त्यात बदल

g. म्युच्युअल फंड युनिट्सचे डेबिट

h. पॉवर ऑफ ॲटर्नीची नोंदणी करणे आणि नोंदणी रद्द करणे

i. नामांकन केले गेलेल्या व्यक्तीच्या नावात सुधारणा करणे, रद्द करणे / हटविणे

j. प्लेज इंटीमेशन, कंफरमेशन आणि इंव्होकेशन (टू प्लेजर)

k. टेंडर ऑफर इंस्ट्रक्शनच्या संदर्भात शेअर्सचे ब्लॉकिंग आणि डेबिट

डिपॉझिटरी सिस्टीममध्ये, पत्त्यात बदल, पॉवर ऑफ ॲटर्नीची नोंदणी करणे आणि नोंदणी रद्द करणे, या स्थितीत खातेधारकाने ही सुविधा घेतली आहे किंवा नाही याचा विचार न करता, नोंदणीकृत मोबाईल फोनवर एसएमएस पाठविले जातात.

### 4. मी एसएमएस अलर्ट सुविधेसाठी नोंदणी का करावी?

एनएसडीएल, नोंदणीकृत मोबाईल नंबरवर डिमॅट खात्यात झालेल्या अनेक महत्त्वाच्या व्यवहारांचे थेट संदेश पाठविते. ही तुमच्या डिमॅट खात्याच्या रक्षणासाठी एक परिणामकारक निरीक्षण पद्धत म्हणून काम करते. याकरिता आपण ॲलर्ट सुविधेसाठी नोंदणी करावी.

### 5. ही सुविधा मिळविण्यासाठी काय शुल्के आहेत?

ही सुविधा खातेधारकाला पुरविण्यासाठी एनएसडीएलकडून डीपीजवर कोणतेही शुल्क आकारले जात नाही.

6. डिमॅट खाते उघडण्याच्या वेळी मी माझा मोबाईल क्रमांक डीपीला दिला आहे. तरी देखील मला या सुविधेसाठी नोंदणी करावी लागेल काय?

तुम्हाला एसएमएस मिळत नसतील, तर तुम्हाला डिपॉझिटरी सिस्टीममध्ये संदेश फ्लॅग सक्षम करण्यासाठी तुमच्या डीपीला एक विनंती अर्ज देण्याची गरज पडेल. केवळ मोबाईल क्रमांक देणे पर्याप्त नाही.

7. माझा मोबाईल क्रमांक बदलला तर मी काय करावे?

जर तुम्ही तुमचा मोबाईल क्रमांक बदलला, तर तुम्हाला केवळ तुमच्या डीपीला तुमचा नवा मोबाईल क्रमांक लिखित स्वरूपात कळवावा लागेल. एकदा डिपॉझिटरी सिस्टीममध्ये डीपीद्वारा बदल नोंदविण्यात आला, की मग तुम्हाला या संदर्भात जुन्या तसेच नव्या मोबाईल क्रमांकावर एक संदेश मिळेल. जर तुम्ही तुमचा मोबाईल क्रमांक बदलण्याच्या विचारात असाल, तर तुम्ही मोबाईल नंबर पोर्टेबिलिटीचा पर्याय स्वीकारू शकता, ज्याद्वारे तुम्ही तुमचा सध्याचा मोबाईल क्रमांक राखत तुमचा सर्विस प्रोव्हायडर बदलू शकता.

8. एसएमएस अलर्ट सुविधेची नोंदणी करणे माझ्यासाठी अनिवार्य आहे काय?

नाही, केवळ अशा खातेधारकांना वगळून, ज्यांचे एक बेसिक सर्विस डिमॅट खाते आहे आणि ज्याचे खाते पॉवर ऑफ ॲटर्नीद्वारा चालविले जातात, ही सुविधा अनिवार्य नसते, परंतु यासाठी शिफारस नक्कीच केली जाते. संदेश थेट डिपॉझिटरीजकडून पाठविले जात असल्यामुळे, तुम्ही त्या खात्यामध्ये घडणाऱ्या महत्त्वाच्या व्यवहारांवर निरीक्षण ठेवू शकता आणि आवश्यकतेनुसार उचित पावले उचलू शकता.

## डिमॅट खात्यामध्ये म्युच्युअल फंड युनिट्स राखणे

कोणत्याही ॲसेट मॅनेजमेंट कंपनीद्वारा जारी म्युच्युअल फंड युनिट्स, सेक्युरिटीजच्या इतर प्रकारांप्रमाणेच डिमॅट खात्यामध्ये राखले जाऊ शकतात. यामुळे तुम्हाला तुमच्या सर्व गुंतवणुकींवर एकाच ठिकाणावरून लक्ष ठेवणे साध्य होऊ शकते. डिमॅट खातेधारक एनएफओ/ एसआयपीसाठी अर्ज पाठवू शकतो/ शकते आणि डिमॅट खात्यात ते थेट जमा करण्याची विनंती करू शकतो/ शकते.

1. म्युच्युअल फंड युनिट्सचे (स्टेटमेंट ऑफ अकाऊंटद्वारा प्रतिरूपित केलेले) डिमॅट स्वरूपात रूपांतरण करणे म्हणजे काय?

जर तुमच्याकडे म्युच्युअल फंड युनिट्स कागदी स्वरूपात असतील, जे स्टेटमेंट ऑफ अकाऊंट (एसओए) द्वारा प्रतिरूपित असतात आणि तुम्हाला ते डिमॅटच्या स्वरूपात ठेवायचे असलयास, तुम्ही ते तुमच्या डीपीला एका विहित स्वरूपात अर्जाद्वारे सादर करू शकता. याला म्युच्युअल फंड युनिट्स डिमॅट स्वरूपात रूपांतरण करणे असे म्हणतात.

2. जर माझ्याकडे डिमॅट खाते नसेल, तर मी काय करावे?

तुमच्याकडे डिमॅट खाते नसेल, आणि तुम्हाला तुमची म्युच्युअल फंड गुंतवणूक डिमॅट स्वरूपात रूपांतरित करायची असेल, तर तुम्हाला कोणत्याही एनएसडीएल डीपीकडे डिमॅट खाते उघडावे लागेल.

3. म्युच्युअल फंड युनिट्स डिमॅट स्वरूपात राखण्याचे फायदे काय आहेत?

a. तुम्हाला एकच कंसॉलिडेटेड अकाउंट स्टेटमेंट मिळेल, ज्यात म्युच्युअल फंड युनिट्ससह विविध सेक्युरिटीजमधील तुमच्या सर्व गुंतवणुकींचा उल्लेख असतो. तुम्हाला म्युच्युअल फंड कंपन्यांकडून मिळणारे विभिन्न स्टेटमेंट्स पाहण्याची गरज भासणार नाही.

b. तुमच्या डिमॅट खात्यात नोंदविलेल्या पत्त्यातील बदल सर्व संबंधित जारीकर्ता कंपन्या आणि म्युच्युअल फंड कंपन्या / रजिस्ट्रार ॲंड ट्रान्सफर एजंटकडे (आरटीए) नोंदविला जातो. अशा प्रकारे, प्रत्येकाशी स्वतंत्रपणे पत्रव्यवहार करण्याच्या गरजेस हटविले जाते.

c. आयडियाज आणि एनएसडीएल मोबाईल ॲपसारख्या सुविधा वापरून, तुम्ही अत्यंत जलद आणि कार्यक्षम पद्धतीने ट्रांझॅक्शन आणि होल्डिंगवर लक्ष ठेवू शकता.

d. तुमच्या डिमॅट खात्यामधून म्युच्युअल फंड युनिट्स वजा झाल्यावर तुम्हाला एसएमएस अलर्ट मिळेल.

e. स्पीड-ई सुविधेस सबस्क्राइब करून तुम्ही म्युच्युअल फंड युनिट्सच्या ऑनलाईन रिडम्पशनचा पर्याय निवडू शकता.

4. म्युच्युअल फंड युनिट्स (स्टेटमेंट ऑफ अकाऊंटद्वारा प्रतिरूपित केलेले) डिमॅट मध्ये रूपांतरित करण्याची प्रक्रिया काय आहे?

तुम्हाला स्टेटमेंट ऑफ अकाऊंटसह तुमच्या डीपीला एक पूर्ण भरलेला कन्वर्शन रिक्वेस्ट फॉर्म (सीआरएफ) सादर करावा लागेल. जरुरी तपासण्यांनंतर, तुमचा डीपी तुमच्या विनंतीला संबंधित एएमसी / त्याच्या रजिस्ट्रारकडे पाठवेल. एएमसी / रजिस्ट्रारकडून पुष्टी झाल्यानंतर म्युच्युअल फंड युनिट्स तुमच्या डिमॅटमध्ये जमा होतील.

5. नॉन रेसिडंट इंडियन्स (एनआरआय) एनआरआय स्टेटस अंतर्गत असलेल्या म्युच्युअल फंड युनिट्सला डिमॅट स्वरूपात रूपांतरित करू शकतात काय?

होय, या अटीवर की डिमॅट खाते एनआरआय स्टेटसच्या अंतर्गत उघडलेले असले पाहिजे.

6. स्टॉक एक्स्चेंज प्लॅटफॉर्मद्वारा मी म्युच्युअल फंड युनिट्ससाठी कसा सब्स्क्राइब करू शकतो/ शकते?

तुम्हाला तुमच्या स्टॉकब्रोकरला आवश्यक रकमेसह केवळ एक सबस्क्रिप्शन ऑर्डर देण्याची गरज असेल. तुमचा ब्रोकर त्या विनंतीस स्टॉक एक्स्चेंजच्या प्लॅटफॉर्मवर दाखल करेल. पे-आउटच्या दिवशी एएमसी / रजिस्ट्रारकडून युनिट्स मिळाल्यानंतर, तुमचा ब्रोकर / क्लियरिंग कॉर्पोरेशन इच्छित म्युच्युअल फंड्स तुमच्या डिमॅट खात्यामध्ये जमा करण्याची सोय करतील.

7. मी माझ्या डिमॅट खात्यात असलेले म्युच्युअल फंड युनिट्स कशा प्रकारे रिडीम करू शकतो/ शकते?

तुम्ही डिमॅट स्वरूपात असलेल्या तुमच्या म्युच्युअल फंड युनिट्सला तुमच्या डीपी किंवा स्टॉकब्रोकरद्वारा रिडीम करून घेऊ शकता. स्पीड-ई वापरकर्ते रिडम्पशनसाठी ऑनलाईन विनंती देखील करू शकतात.

8. डिमॅट स्वरूपात असलेल्या म्युच्युअल फंड युनिट्सला माझ्या डीपीद्वारा रिडीम करण्याची प्रक्रिया काय आहे?

तुम्हाला योग्य रीतीने भरलेला रिडम्पशन फॉर्म (आरएफ) तुमच्या डीपीला सादर करावा लागेल. आवश्यक तपासण्यानंतर, तुमचा डीपी तुमच्या विनंतीला संबंधित एएमसी / रजिस्ट्रारकडे पाठवेल. आवश्यक पडताळण्या केल्यानंतर, रिडम्पशनची रक्कम एएमसी / रजिस्ट्रार तुमच्या डिमॅट खात्याशी जोडलेल्या बँकेच्या खात्यात थेट जमा करेल. तुम्ही ही रिडम्पशनची विनंती ठराविक प्रमाणासाठी किंवा सर्व युनिट्ससाठी किंवा एखाद्या विशिष्ट रकमेसाठी तुमच्या डीपीला देऊ शकता.

9. डिमॅट स्वरूपात असलेल्या म्युच्युअल फंड युनिट्सला स्टॉकब्रोकरद्वारा रिडीमची प्रक्रिया काय आहे?

तुम्हाला तुमच्या स्टॉकब्रोकरला रिडम्पशन ऑर्डर द्यावा लागेल. सोबत, तुम्हाला तुमच्या डीपीला ते म्युच्युअल फंड युनिट्स एनएसई क्लियरिंग लिमिटेड / इंडियन क्लियरिंग कॉर्पोरेशन लिमिटेडच्या निर्देशित सीएम पूल खात्यामध्ये हस्तांतरित करण्यासाठी डिलिव्हरी इंस्ट्रक्शन स्लिप सादर करावी लागेल.

10. मी म्युच्युअल फंड युनिट्स एका डिमॅट खात्यातून दुसऱ्या डिमॅट खात्यात हस्तांतरित करू शकतो/ शकते का?

होय. तुम्ही म्युच्युअल फंड युनिट्स एका डिमॅट खात्यातून तुमच्या निवडीच्या दुसऱ्या डिमॅट खात्यात हस्तांतरित करू शकता (त्याच किंवा दुसऱ्या डीपी/ डिपॉझिटरीकडील खाते), ज्याला अपवाद म्हणजे असे म्युच्युअल फंड युनिट्स, जे कोणत्यातरी कारणास्तव लॉक-इन स्टेटसमध्ये असतात.

## डिमॅट खात्यास अद्ययावत करणे / त्यात बदल करणे

एक डिमॅट उघडल्यानंतर, अशी परिस्थिती येऊ शकते, जेथे खाते उघडण्याच्या अर्जात दिलेल्या माहितीत काही बदल झालेला असतो. उदा -

a. खातेधारकाचे नाव

b. खातेधारकाचा पत्ता

c. बँकेच्या खात्याचे तपशील

d. नामांकित व्यक्ती किंवा पॉवर ऑफ अॅटर्नी होल्डर

e. खातेधारकाची स्वाक्षरी

f. इमेल आयडी

g. टेलिफोन / मोबाईल क्रमांक

अशा कोणत्याही परिस्थितीमध्ये, खातेधारकाला बदललेली माहिती डीपीला देणे आवश्यक असेल, जेणेकरून डिपॉझिटरीमधील नोंदी अद्ययावत केल्या जातील आणि सेवा कोणत्याही व्यत्ययाविना दिल्या जाऊ शकतील. खातेधारकाला आवश्यक कागदपत्रांसह स्वाक्षरीकृत लिखित विनंती डीपीला द्यावी लागेल.

### 1. खाते उघडल्यानंतर खातेधारकाचे नाव बदलले जाऊ शकते काय?

होय. डिमॅट खाते उघडल्यानंतर त्या डिमॅट खात्यातील खातेधारकाचे नाव बदलले जाऊ शकते. त्यासाठी इच्छित बदलानुसार लिखित विनंतीसह सपोर्टिंग डॉक्युमेंट्सची गरज असते. डीपीद्वारा झालेल्या कोणत्याही डेटा एन्ट्रीच्या त्रुटीमुळे बदल करावयाचा असेल, तर त्याला संबंधित खातेधारकाच्या विनंतीवर किंवा खातेधारकाकडे कोणतीही कागदपत्रे न मागता डीपीद्वारा स्वाधिकारे सुधारणा केली जाऊ शकते.

a. बारीक दुरुस्त्यांच्या प्रकरणी (जसे स्पेलिंग, अॅब्रीव्हीएशन किंवा इनिशिअल्समध्ये सुधारणा), अचूक नाव असलेले पॅन कार्ड, पारपत्र, मतदार ओळखपत्र, आधार कार्ड, वाहनचालक परवाना, नरेगा कार्ड यांच्यासारख्या ओळखीच्या पुराव्याचे कोणतेही

स्वयंसाक्षांकित कागदपत्र आवश्यक असतील. यासोबत खातेधारकांनी याची देखील पुष्टी देणे आवश्यक आहे, की व्यक्तिगत नावातील बदलासाठी विवाह, घटस्फोट, न्यायालयीन आदेश, इ. प्रमाणे कोणतेही कारण नाही. जर एखादी व्यक्ती न्युमरॉलॉजी इ. कारणास्तव त्याच्या नावाचे स्पेलिंग बदलत असेल, तर त्याला नावातील बदल असे मानले जाईल, आणि नावाची दुरुस्ती मानली जाणार नाही.

b. नावाच्या बदलाच्या किंवा सुधारणेच्या अन्य प्रकरणांमध्ये, खालील कागदपत्रांची आवश्यकता असेल -

| विवाहामुळे नावातील बदल | विवाहाव्यतिरिक्त कारणामुळे नावातील बदल |
|---|---|
| पतीचे नाव दर्शविणारे विवाह प्रमाणपत्र किंवा पारपत्राची प्रत किंवा सरकारी राजपत्रातील नावाच्या बदलाचे प्रकाशन | सरकारी राजपत्रातील नावाच्या बदलाचे प्रकाशन |

कर्नाटक आणि पंजाबच्या रहिवाश्यांसाठी, जेथे सरकारी राजपत्रातील नावाच्या बदलाचे प्रकाशन कदाचित उपलब्ध नसेल, अशा ठिकाणी खालील कागदपत्रे पुरविली जाऊ शकतात -

a. नाव आणि त्याच्या संपूर्ण पत्त्याच्या बदलासाठी कारणाचा उल्लेख करणारे नोटरी पब्लिक / प्रथम वर्ग दंडाधिकारी / कार्यकारी दंडाधिकारी यांच्यासमोर घेतलेल्या शपथेवरील शपथपत्र.

b. एका स्थानिक आणि एका राष्ट्रीय वृत्तपत्रात प्रकाशन.

c. बदललेल्या नावासह असलेल्या ओळखपत्राच्या आणि पत्त्याच्या पुराव्याचे कागदपत्र.

खातेधारकाने पडताळणीसाठी मूळ कागदपत्रासह वरील कागदपत्राची सेल्फ अटॅस्टेड प्रत सादर केली पाहिजे.

2. डिमॅट खात्यासह नोंदणी केलेल्या माझ्या बँकेच्या खात्याचा तपशील मी बदलू शकतो/ शकते काय?

होय. तुम्ही डिमॅट खात्यामध्ये नोंदणी केलेल्या तुमच्या बँकेच्या खात्याचा तपशील तुम्ही कोणत्याही वेळी तुमच्या डीपीला एक लिखित विनंती देऊन बदलू शकता. तुम्हाला तुमच्या नव्या बँकेच्या खात्यासंबंधीचे सपोर्टिंग डॉक्युमेंट देण्याची देखील गरज पडेल. उदा. पासबुकची प्रत किंवा खात्याचे विवरणपत्र किंवा रद्द केलेल्या धनादेशाचे पान, ज्यात तुमचे नाव, बँकेचा खाता क्रमांक, बँकेचे नाव, एमआयसीआर कोड आणि आयएफएससी असेल.

3. माझा पत्ता बदलल्यास मी काय करावे? मला प्रत्येक कंपनीला वेगवेगळे लिहून कळवावे लागेल काय?

तुमचा पत्ता बदलल्यास, तुम्हाला तुमचा नवा पत्ता तुमच्या डीपीला कळवावा लागेल. जेव्हा डीपी त्या डिपॉझिटरी सिस्टीममध्ये नवा पत्ता दाखल करेल, तेव्हा तो आपोआप सर्व कंपन्यांना कळविला जाईल, ज्यांचे शेअर्स / युनिट्स इ. तुमच्याकडे असतील.

4. माझ्या डीपीकडे असलेला माझा पत्ता मी कसा बदलू शकतो/ शकते?

तुम्ही तुमच्या डीपीला एक लिखित विनंती देऊन डिपॉझिटरी सिस्टीममधील तुमचा पत्ता बदलू शकता. जर खाते जॉइंट स्वरूपात असेल, तर अशा विनंतीवर सर्व जॉइंट होल्डर्सच्या स्वाक्षऱ्या असणे जरुरी आहे. त्या विनंतीसोबत खालील कागदपत्रे सादर करावी लागतील -

a. डिमॅट खात्याचे शेवटचे ट्रांझॅक्शन स्टेटमेंट (ग्राहक डीपीला स्वतःहून भेटत असेल, तर याची आवश्यक नाही).

b. पॅन कार्ड, पारपत्र, मतदार ओळखपत्र, आधार कार्ड, वाहनचालक परवाना, नरेगा कार्ड यांच्यासारख्या ओळखीच्या पुराव्याचे कोणतेही सेल्फ अटॅस्टेड कागदपत्र.

c. नव्या पत्त्याचा पुरावा म्हणून पारपत्र, मतदार ओळखपत्र, आधार कार्ड, वाहनचालक परवाना अशा कोणत्याही कागदपत्राची सेल्फ अटॅस्टेड कॉपी.

तुम्हाला तुमच्या डीपीद्वारा छायाप्रतीच्या पडताळणीसाठी मूळ कागदपत्र दाखविणे आवश्यक असेल. तुम्ही किंवा तुमच्या अधिकृत प्रतिनिधीने पार्टीसिपंटच्या अधिकाऱ्याच्या

उपस्थितीत पुन्हा एकदा अर्जावर स्वाक्षरी केली पाहिजे. एकदा डिपॉझिटरी सिस्टीममध्ये पत्त्याच्या बदलाच्या विनंतीचे प्रक्रियण झाले की एनएसडीएलद्वारा, डीपीकडून पूर्वसूचनेसोबतच, खातेधारकाला(कांना) अद्यतनाविषयी एक इमेल पाठविला जाईल.

## डिमॅट खात्यामध्ये कॉर्पोरेट फायदे मिळविणे

1. रेकॉर्ड डेटचे महत्त्व काय आहे?

रेकॉर्ड डेट म्हणजे एखाद्या कंपनीद्वारा कोणत्याही प्रकारच्या कॉर्पोरेट फायद्यांचा वाटप करण्यासाठी शेअरहोल्डर्सच्या यादीस विचारात घेण्याचा अखेरचा दिवस समजला जातो. त्या 'रेकॉर्ड डेटला' शेअरहोल्डर्सच्या यादीत तुमचे नाव आढळले, तर त्या कंपनीद्वारा घोषित लाभ मिळविण्यासाठी तुम्ही हक्कदार असाल. त्यामुळे, तुम्ही खरेदी केलेल्या सेक्युरिटीज रेकॉर्ड डेटच्या अगोदर तुमच्या ब्रोकरद्वारा तुमच्या खात्यात हस्तांतरित झाल्याची खात्री करणे महत्त्वाचे असते.

2. मी माझे डीवीडंड / व्याज किंवा अन्य रोख मिळण्याचे अधिकार कसे मिळवू शकतो/ शकते?

संबंधित कंपनी रेकॉर्ड डेटला एनएसडीएलकडून लाभार्थी धारकांचे तपशील मिळविते. देय रक्कम त्या डिमॅट कंपनीद्वारा थेट डिमॅट खातेधारकाच्या खात्याशी जोडलेल्या बँक खात्यात जमा केली जाते.

3. जर मी शेअर्स डिमॅट स्वरूपात राखले असतील, तर मला बोनस शेअर्स कसे मिळतील?

संबंधित कंपनी रेकॉर्ड डेटला एनएसडीएलकडून लाभार्थी धारकांचे आणि त्यांच्या होल्डिंगचे तपशील मिळविते. तुम्ही हक्कदार असलेल्या शेअर्सची संख्या त्या कंपनी / त्याच्या आरटीएद्वारा तुमच्या डिमॅट खात्यात जमा केली जाते.

4. माझ्या डिमॅट खात्यात जमा झालेले बोनस / राईट्स अचूक असल्याची पुष्टी मी कशी करावी?

बोनस / राईट्सचे वाटपाचे ॲड्वाईस जारीकर्ता कंपनी / त्याच्या आरटीएद्वारा जारी केले जातात. तुम्ही ते तुम्हाला मिळालेल्या डिमॅट खात्याच्या स्टेटमेंटमध्ये तपासावे. त्या ॲड्वाईसमध्ये दाखविलेली संख्या आणि खात्याचे स्टेटमेंट जुळले पाहिजे.

## एनएसडीएल सेवा शुल्के

1. खाते उघडण्यासाठी आणि डिपॉझिटरीच्या संबंधित इतर व्यवहारांसाठी किती शुल्के असतात?

एनएसडीएल, डिमॅट खातेधारकांकडून कोणत्याही प्रकारचे शुल्क घेत नाही. एनएसडीएलची शुल्के त्याच्या डीपीजसाठी निश्चित असतात. डीपीजद्वारा देय अशा एनएसडीएल शुल्कांचे पूर्ण तपशील https://nsdl.co.in/joining/fee-payable-by-depository-participants.php वर उपलब्ध आहेत.

डीपी ते देत असेलल्या सेवांसाठी त्याच्या ग्राहकांकडून शुल्क वसूल करतात. विविध सेवांसाठी डीपी आकारत असलेल्या शुल्कांचा उल्लेख 'टॅरिफ शीट' मध्ये दिलेला असतो, जे तुम्हाला खाते उघडण्याच्या वेळी दिले जाते. भविष्यातील संदर्भासाठी तुम्ही याची एक प्रत सांभाळून ठेवली पाहिजे. डीपीला वाटल्यास, ते तुम्हाला 30 दिवसांची पूर्वसूचना देत त्यात बदल करू शकतात.

# तुमच्या डिमॅट खात्याची काळजी घेणे

1. डीआयएसवर एक्सिक्यूशन डेटचा उल्लेख न करणे बरोबर आहे काय?

नाही. एक्सिक्यूशन डेटचा उल्लेख न करता तुमच्या डीपीला डिलिव्हरी इंस्ट्रक्शन स्लिप (डीआयएस) सादर करू नये. ही एक अशी तारीख असली पाहिजे ज्या तारखेस उल्लेखित सेक्युरिटीजसाठी आणि त्याच्या संख्येसाठी तुम्हाला तुमच्या खात्यातून सेक्युरिटीज डेबिट व्हायला हव्यात. मार्केट सूचनेच्या प्रकरणी, हे पे-इन डेटच्या आधीच्या तारखेचे असले पाहिजे. ऑफ-मार्केट हस्तांतरणांसाठी, ही तुमच्या निवडीची भविष्यातील तारीख असू शकते.

2. माझ्या डीपीने प्रत्येक व्यवहारानंतर माझ्या खात्यास अद्ययावत केले आहे हे मला कसे कळेल?

तुमच्या खात्यातील घडामोडींवर लक्ष ठेवण्यास मदत मिळावी यासाठी तुम्हाला वेळोवेळी व्यवहार आणि शिल्लक दर्शविणारे स्टेटमेंट तुम्हाला मिळत राहील. या व्यतिरिक्त तुम्ही एसएमएस अलर्ट, आयडियाज आणि मोबाईल ॲपसारख्या सुविधा वापरून देखील त्याचे संनिरीक्षण करू शकता.

3. माझे डिमॅट खात्याचे स्टेटमेंट मला किती काळाने मिळाले पाहिजे?

जर त्या महिन्यात ट्रांसॅक्शन असेल तर एनएसडीएल तुम्हाला दर महिन्यात कंसॉलिडेटेड अकाउंट स्टेटमेंट पाठवते (बीएसडीए होल्डर्ससाठी तीन महिन्यांच्या कालावधीत पाठवते). त्या खात्यात कोणतेही व्यवहार झालेले नसतील, किंवा जर त्या वर्षात शिल्लक शून्य झाली असेल, तर अशा ग्राहकांना वर्षभराचे स्टेटमेंट पाठविले जाते.

4. माझ्या खात्याच्या स्टेटमेंटमध्ये कोणत्याही विसंगती असल्यास मी काय करावे?

तुमच्या खात्याच्या स्टेटमेंटमध्ये कोणत्याही विसंगतीच्या प्रकरणी, तुम्ही त्वरित तुमच्या डीपीशी संपर्क साधला पाहिजे. जर विसंगती डीपी पातळीवर सोडवली जाऊ शकली नाही, तर तुम्ही एनएसडीएलशी संपर्क साधला पाहिजे.

5. माझ्या खात्याचे स्टेटमेंट हरवले तर मी काय करावे?

काळजी करण्याचे काही कारण नाही. तुम्ही एनएसडीएलला आवश्यक कालावधीचे स्टेटमेंट पुन्हा पाठविण्यासाठी विनंती करू शकता. ई-सीएएसचा पर्याय स्वीकारणे तुमच्यासाठी सुविधाजनक असू शकते, जेणेकरून स्टेटमेंट गहाळ होण्याची किंवा मधे हरविण्याची शक्यता नाहीशी होते. आयडीयाज आणि मोबाईल ॲपसारख्या सुविधा वापरून तुम्ही तुमच्या इच्छेनुसार खात्याचे स्टेटमेंट पाहू / डाऊनलोड करू शकता.

6. खाते फ्रीज करणे म्हणजे काय? ते मी कसे करू शकतो/ शकते?

डिमॅट खात्यातील कोणताही व्यवहार केवळ खातेधारकाच्या वैध सुचनेवर संभव असतो. सोबत, डीपीजच्या बाजूने डिपॉझिटरी सॉफ्टवेअरमध्ये एंट्री करणे मेकर चेकर सिस्टीमद्वारा शक्य असतात. तरी देखील, कोणत्याही अवांच्छित व्यवहारांना टाळण्यासाठी, डिमॅट खातेधारक डीपीला एक लिखित विनंती पाठवून आपले खाते फ्रीज करण्याचा पर्याय वापरू शकतो/ शकते. फ्रीज करण्याचे प्रकार खालील प्रमाणे उपलब्ध आहेत -

a. केवळ डेबिट्स फ्रीज करणे - डिमॅट खातेधारक त्याच्या डीपीला फ्रीज सूचना देत केवळ डेबिट्ससाठी खाते फ्रीज करू शकतो/ शकते. तथापि, फ्रीज असलेल्या कालावधीदरम्यान, त्या खातेधारकाला अन्य कोणत्याही कॉर्पोरेट प्रक्रियेतून मिळणारे बोनस किंवा क्रेडिट्स जमा होणे चालू राहील.

b. डेबिट्स आणि क्रेडिट्स दोन्ही फ्रीज करणे - एक खातेधारक डेबिट्स आणि क्रेडिट्स दोन्ही फ्रीज करू शकतो/ शकते. खातेधारकाने फ्रीज रद्द करण्याची सूचना जारी केल्या शिवाय त्या खात्यात डेबिट्स आणि क्रेडिट्स दोन्ही केले जाऊ शकणार नाही. ही सुविधा अशा ग्राहकांसाठी फायद्याची असते, जे दीर्घकाळासाठी त्यांचे खाते वापरणार नसतीत. डेबिट्स आणि क्रेडिट्ससाठी खाते फ्रीज केल्याने ते त्यांच्या खात्यांमध्ये अनुचित क्रेडिट्स आणि सोबत डेबिट्स देखील टाळू शकतात.

c. खात्यामधील ठराविक आयएसआयएन(एस) फ्रीज करणे - एखादा खातेधारक संपूर्ण खाते न फ्रीज करता ‘डेबिट’ किंवा ‘डेबिट’ आणि ‘क्रेडिट’ दोन्हीसाठी एखादे ठराविक आयएसआयएन(एस) (एखाद्या विशिष्ट कंपनीच्या सेक्युरिटीज) फ्रीज करू शकतो/ शकते. जर या प्रकारची फ्रीज करण्याची सुविधा वापरली, तर त्या खात्यातील इतर सर्व

सेक्युरिटीज डेबिट किंवा क्रेडिट केले जाऊ शकतील, परंतु ठराविक आयएसआयएन(एस)च्या अंतर्गत असलेल्या सेक्युरिटीज अनुक्रमे 'डेबिट' किंवा 'डेबिट' आणि 'क्रेडिट' दोन्हीसाठी गोठविले जातील. ग्राहक त्या डिमॅट खात्यात असलेल्या इतर सेक्युरिटीज वापरू शकेल तसेच, केवळ डेबिटसाठी फ्रीज केलेल्या आयएसआयएनमध्ये क्रेडिट देखील मिळवू शकेल.

d. खात्यातील एका आयएसआयएनच्या अंतर्गत धारण केलेल्या विशिष्ट सेक्युरिटीजच्या संख्येस फ्रीज करणे. एखादा खातेधारक एका खात्यातील ठराविक सेक्युरिटीजची काही संख्या फ्रीज करू शकतो/ शकते.

7. माझा डीपी कर्जबाजारी झाला किंवा काम थांबविले तर काय होईल?

अतिशय दुर्मिळ प्रसंगी तुमचा डीपी कर्जबाजारी होण्याचे किंवा कार्य थांबविण्याची वेळ आल्यास, डिमॅट खातेधारकांच्या हिताला जपले जाते. अशा परिस्थितीमध्ये, तुम्हाला तुमची शिल्लक तुमच्या निवडीच्या दुसऱ्या डीपीकडे हस्तांतरित करण्याचा किंवा त्यांना रिमटेरियलाइझ करण्याचा पर्याय दिला जातो.

8. डिपॉझिटरी सिस्टीममधील डेटाच्या संरक्षणासाठी एनएसडीएल कोणत्या खबरदाऱ्या घेते?

डेटाची सुरक्षा आणि डेटाची अखंडता यांना एनएसडीएलद्वारा सर्वात महत्त्वाचे मानले जाते आणि सर्वोच्च प्राथमिकता दिली जाते. या संदर्भात एनएसडीएल सर्वोच्च प्रमाण राखते. डीपीजने देखील ग्राहकांचा डेटा आणि संपत्ती सुरक्षित राहील याची खात्री करण्यासाठी अत्यंत उचित अशा प्रचलनांचे पालन केले पाहिजे.

या संदर्भात एनएसडीएलद्वारा अवलंबिल्या जाणाऱ्या काही उपाययोजना खालीलप्रमाणे आहेत -

a. डीपी पातळीवर तसेच डिपॉझिटरी पातळीवर डेटाचा रोज बॅकअप घेतला जातो.

b. डीपीज आणि डिपॉझिटरी दोघांद्वारे बॅकअप स्थानिक पातळीवर तसेच, एका रिमोट साईटवर देखील दररोज स्टोर केला जातो.

c. कोणत्याही व्यत्यय स्थितीमध्येसुद्धा कार्य सुरळीतपणे चालू राहण्याच्या खात्रीसाठी, एनएसडीएल बॅकअप साईट तसेच, एक डिझास्टर रिकव्हरी साईटची देखभाल करते.

d. डेटा हाताळणी आणि सायबर सुरक्षा चौकटीच्या संदर्भात उद्योगक्षेत्रातील सर्वोत्कृष्ट पद्धतींचा अवलंब केला जातो.

e. डिपॉझिटरी इन्फ्रास्ट्रक्चरसाठी वापरण्यात येणाऱ्या क्रिटीकल इक्वीपमेंट, कम्युनिकेशनसिस्टिम आणि युटीलिटीजसाठी फॉल बॅक मेकॅनिझमचा वापर केला जातो.

f. डेटा व्यावसायिक आणि पात्र विशेषज्ञांद्वारा अत्याधुनिक डेटा सेंटरमध्ये स्टोर केला जातो.

g. विविध पातळ्यांवर लॉजिकल आणि फिजिकल ॲक्सेस बॅरियर अवलंबिले जातात.

h. डिपॉझिटरी सिस्टीममध्ये महत्त्वाच्या डेटा एन्ट्रीसाठी मेकर चेकर सिस्टीमचे पालन केले जाते.

i. एनएसडीएलने आयएसओ - 27001 प्रमाणपत्र (माहिती सुरक्षा व्यवस्थापनसाठी) आणि आयएसओ 22301:2012 प्रमाणपत्र (व्यवसाय निरंतरता व्यवस्थापन प्रणालीसाठी) प्राप्त केले असून, त्याद्वारे उद्योगक्षेत्रातील सर्वोत्कृष्ट पद्धतींचे पालन दर्शविले जाते.

9. एनएसडीएल त्याचे डीपीज विहित आवश्यकतांचे पालन करीत असल्याची खात्री कशा रितीने करते?

एनएसडीएलद्वारा सर्व डीपीजची वर्षातून किमान एकदा तपासणी होते. सोबत, त्यांना डिपॉझिटरी कार्याचे ऑडीट करण्यासाठी एका स्वतंत्र आणि अर्हताप्राप्त ऑडीटरची सेवा घेणे आवश्यक असते. अशा लेखा परीक्षणाचे अहवाल एनएसडीएलकडे वर्षातून दोनदा पाठविले पाहिजेत. डीपीजचे सेबीद्वारा देखील निरीक्षण होते.

10. एनएसडीएल कोणत्याही सरकारी प्राधिकरणाद्वारा विनियमित असते काय?

एनएसडीएलला सेबीद्वारा सेक्युरिटीजचे डिपॉझिटरी म्हणून काम करण्यासाठी अधिकार दिलेले आहेत. एनएसडीएल, कंपनी कायदा, 2013 च्या अनुसार इतर लागू ऑडीटसोबत सेबीद्वारा वेळोवेळी निरीक्षणाच्या अधीन असते.

11. डिपॉझिटरी कार्यांसाठी विमा उपलब्ध असतो काय?

सर्व डीपीजच्या वतीने एनएसडीएल एक विमा संरक्षण प्राप्त करते.


## अधिक माहिती

### न मिळालेल्या डीवीडंड / शेअर्ससाठी रिफंडचा दावा करणे

कोणत्याही कारणास्तव सलग सात वर्षांसाठी न दिल्या गेलेले किंवा दावा न केलेले सर्व डीवीडंड / शेअर्स संबंधित कंपन्यांद्वारा इन्व्हेस्टर एज्युकेशन अँड प्रोटेक्शन फंड (आयईपीएफ) प्राधिकरणामध्ये हस्तांतरित केले जातात. आयईपीएफ प्राधिकरण एक संविधानिक संस्था आहे, जिचा निर्माण कंपनी कायदा, 2013 च्या अंतर्गत झाला आहे.

गुंतवणूकदार किंवा त्याच्या / तिच्या अधिकृत प्रतिनिधींना न दिलेल्या डीवीडंड आणि/ किंवा दावा न केलेले शेअर्स मिळविण्यासाठी आयईपीएफ प्राधिकरणाकडे दावा करण्याची गरज असते. दाव्याच्या पडताळणीनंतर, कंपनी आयईपीएफ ऑथोरिटीकडे दाव्याची पुष्टी करते, जी नंतर दावेदाराला इलेक्ट्रॉनिक ट्रान्सफरद्वारा त्याच्या / तिच्या जोडलेल्या बँक खात्यात रिफंड देण्याची प्रक्रिया सुरु करते. जर दावा शेअर्ससाठी असेल, तर त्यांना दाव्याच्या अर्जात नमूद केलेल्या डिमॅट खात्यामध्ये जमा केले जाते. संपूर्ण प्रक्रिया आणि आवश्यक कागदपत्रे खालील आकृती क्रमांक 8 मध्ये दाखविले आहेत. एक अर्जदार एका आर्थिक वर्षात एका कंपनीसाठी एक दावा दाखल करू शकतो/ शकते. अधिक माहितीसाठी, कृपया http://www.iepf.gov.in/ वर भेट द्या. हे जाणून घेणे महत्त्वाचे आहे की सर्व कंपन्यांनी त्यांच्या वेबसाईटवर दावा न केलेले शेअर्स आणि डीवीडंडचे तपशील प्रकाशित करावे.

**दाव्याची प्रक्रिया**



| | | | |
|---|---|---|---|
| चरण 1<br>आयईपीएफ-5 अर्ज डाऊनलोड करा<br><br>www.iepf.gov.in | चरण 2<br>अर्ज अपलोड करा<br>A. अपलोड लिंकवर अर्ज दाखल करा<br>B. 'स्वीकृती' आणि 'एसआरएन' सेव्ह करा | चरण 3<br>अर्ज प्रिंट करणे<br><br>दाखल केलेल्या अर्जाची एक प्रत प्रिंट करून घ्या | चरण 4<br>अर्ज दाखल करा<br>छापील अर्ज आणि इतर कागदपत्रे त्या कंपनीच्या 'नोडल ऑफिसर'ला त्याच्या नोंदणीकृत कार्यालयात सादर करा. |

दाव्याच्या पडताळणीनंतर, दावेदाराला इलेक्ट्रॉनिक ट्रान्स्फरद्वारा किंवा दावेदाराच्या डिमॅट खात्यात रिफंड हस्तांतरित केले जाते.

**आकृती 8**

# सेक्युरिटीजच्या हस्तांतरणासाठी डिमॅट अनिवार्य

1 एप्रिल 2019 पासून सेबीने लिस्टेड कंपन्यांच्या सेक्युरिटीजच्या कोणत्याही हस्तांताराणांना केवळ डिमॅट स्वरूपात करावे असे अनिवार्य केले आहे. म्हणजेच, तुमच्याकडे एखाद्या लिस्टेड कंपनीचे शेअर्स कागदोपत्री स्वरूपात असतील आणि तुम्हाला दुसऱ्यांना हस्तांतरित करावयाचे असतील, तर तुम्ही ते 1 एप्रिल 2019 पासून केवळ डिमॅट स्वरूपात रूपांतरित केल्यानंतरच करू शकाल. या तारखेपासून, शेअर्स इ. साठी ट्रान्समिशन (म्हणजे शेअरहोल्डरच्या मृत्यु प्रकरणी शेअर्सचे हस्तांतरण) आणि ट्रान्सपोजिशन (म्हणजे शेअरहोल्डर्सच्या नावांच्या क्रमात बदल) केवळ कागदोपत्री स्वरूपात असलेल्यांसाठी अनुमत असेल. त्यामुळे शक्य तितक्या लवकर, डिमॅट खाते उघडणे आणि तुमचे शेअर्स डिमॅटमध्ये रूपांतरित करणे फायद्याचे राहील!

अनलिस्टेड पब्लिक कंपन्यांसाठी डिमॅट अनिवार्य

मिनिस्ट्री ऑफ कॉर्पोरेट अफेअर्सने (एमसीए) 10 सप्टेंबर 2018 रोजी एक अधिसूचना जारी केली होती, ज्यात असे विहित केले होते की अनलिस्टेड पब्लिक कंपन्यांनी डिपॉझिटरी सिस्टीममध्ये सामील झाले पाहिजे आणि त्यांचे शेअर्स डिमॅटसाठी उपलब्ध केले पाहिजेत. या कंपन्यांद्वारे पुढील शेअर्स जारी करणे केवळ डिमॅट स्वरूपात असेल. या दोन्ही आवश्यकता 2 ऑक्टोबर 2018 पासून लागू आहेत. अशा कंपन्यांमधील धारक त्यांचे होल्डिंग डिमॅट स्वरूपात रूपांतरित करू शकतात आणि संबंधित फायदे मिळवू शकतात. याची नोंद घ्या की तुमच्याकडे आधीपासूनच एक डिमॅट खाते असेल, तर या शेअर्सच्या होल्डिंगसाठी तुम्हाला दुसरे डिमॅट खाते उघडण्याची गरज नसेल. कागदोपत्री स्वरूपात असलेली तुमची गुंतवणूक, या अटीवर की त्या होल्डिंगचा प्रकार सारखाच असेल, तर त्याच डिमॅट खात्यामध्ये डिमॅट स्वरूपात रूपांतरित केल्या जाऊ शकतील.

## गुंतवणूकदार जागरुकता कार्यक्रम

एनएसडीएल संपूर्ण देशभर गुंतवणूकदार जागरूकता कार्यक्रमाचे आयोजन करते. अशा कार्यक्रमांचे वेळापत्रक https://nsdl.co.in/Investor-Awareness-Programmes.php येथे उपलब्ध असते. जर तुम्हाला तुमच्या हाऊसिंग सोसायटीमध्ये, संस्थेमध्ये, कंपनीमध्ये किंवा शहरात गुंतवणूकदार जागरुकता कार्यक्रमाचे आयोजन करावयाचे असेल, तर आम्हाला info@nsdl.co.in वर लिहा.

## गुंतवणूकदारांसाठी एनएसडीएल न्यूजलेटर

एनएसडीएल त्याची विविध उत्पादने / सेवा आणि डिपॉझिटरीच्या इतर महत्त्वाच्या वैशिष्ठ्यांबद्दल गुंतवणूकदार आणि डिमॅट खातेधारकांना अद्ययावत ठेवण्यासाठी ‘द फायनाशिंयल कॅलिडोस्कोप’ हे मासिक प्रकाशित करते. तुम्ही https://nsdl.co.in/e-newsletter.php येथे तुमचा इमेल आयडी देऊन हे सबस्क्राइब करू शकता.

या मासिकाच्या मागील सर्व आवृत्त्या तुम्हाला वाचण्यासाठी https://nsdl.co.in/publications/nest.php येथे उपलब्ध आहेत.

## तक्रार निवारण

सेबी तसेच एनएसडीएल या दोघांकडे एखाद्या गुंतवणूकदाराच्या तक्रार किंवा समस्येला संबोधित करण्यासाठी एक औपचारिक यंत्रणा आहे. एखादी समस्या किंवा तक्रार असल्यास ते प्रकरण सर्वप्रथम तुमच्या स्टॉकब्रोकर / डीपीकडे नेणे उचित ठरेल. तुमच्या स्टॉकब्रोकर / डीपीचे संपर्क तपशील त्यांनी दिलेल्या कागदपत्रांवर किंवा त्यांच्या वेबसाईट्सवर तुम्हाला मिळतील. त्यांनी दिलेल्या तोडग्यावर तुमचे समाधान झाले नाही किंवा त्यांनी ठराविक समयसीमेत कोणतेही निवारण दिले नाही, तर तुम्ही ते प्रकरण संबंधित स्टॉक एक्स्चेंज किंवा डिपॉझिटरीकडे नेऊ शकता. पर्यायाने, तुम्ही ते सेबीकडे https://scores.gov.in/scores/Welcome.html येथे ऑनलाईन देखील दाखल करू शकता.

तुम्ही तुमच्या डिमॅट खात्याशी संबंधित बाबी / तक्रारी एनएसडीएलला या पुस्तिकेत दिलेल्या टपाल पत्त्यावर लिहू शकता.

## इतर गुंतवणूकदार केंद्रित सेवा

### नॅशनल स्कील रजिस्ट्री (एनएसआर)

एनएसआर एक वेबवर आधारित यंत्रणा आहे, ज्यात भारतीय आयटी आणि आयटीइएस / बीपीओ उद्योगाच्या अस्तित्वातील आणि संभावित कर्मचाऱ्यांविषयी माहिती आहे. हा नास्कॉमचा एक उपक्रम आहे. अधिक माहितीसाठी, कृपया https://nationalskillsregistry.com/ वर भेट द्या.

## केवायसी रजिस्ट्रेशन एजन्सी (केआरए)

गुंतवणूकदारांच्या केंद्रीकृत केवायसी नोंदी अपलोड करा आणि डाऊनलोड करा. अधिक माहितीसाठी, कृपया भेट द्या https://kra.ndml.in/.

## नॅशनल अकॅडेमिक डिपॉझिटरी (एनएडी)

विद्यार्थी, पडताळक आणि अकॅडेमिक इंस्टिट्यूशन यांना पाहता येतील असे डिजिटाइज्ड ऑथेंटिक अकॅडेमिक सर्टिफिकेटस. अधिक माहितीसाठी, कृपया https://nad.ndml.in/ वर भेट द्या.

## एनआयआर खाते (ई-इन्शुरन्स अकाऊंट)

एनडीएमएलने भारतीय विमा नियामक आणि विकास प्राधिकरणच्या (आयआरडीएआय) वतीने नॅशनल इन्शुरन्स रिपॉझिटरीची (एनआयआर) स्थापना केली आहे. यामुळे सर्व प्रकारच्या विमा पॉलिसी एकाच ई-इन्शुरन्स अकाऊंटमध्ये (ई-आयए) राखण्याची सुविधा मिळते आणि यामुळे विमाधारक सर्व विमा पॉलिसीज एकाच लॉगीनमध्ये ॲक्सेस करू शकेल. हे खाते मोफत उघडले जाऊ शकते. अधिक माहितीसाठी, कृपया https://www.nir.ndml.in/ वर भेट द्या.

वरील सेवा एनएसडीएल डेटाबेस मॅनेजमेंट लिमिटेड (एनडीएमएल) द्वारा प्रस्तुत केल्या जातात, जी एनएसडीएलची एक 100% सबसिडीयरी कंपनी आहे.

## एनएसडीएलशी संपर्क साधा

- कोणतीही चौकशी किंवा तक्रार - https://www.epass.nsdl.com/epass/complaints/websitecomplaints.aspx
- समस्या / तक्रारीसाठी ई-मेल आयडी - relations@nsdl.co.in
- इतर माहिती / स्पष्टीकरणासाठी ई-मेल आयडी - info@nsdl.co.in
- डिमॅट खातेधारकांसाठी टोल फ्री हेल्पलाईन - 1800 222 990

### एनएसडीएलची कार्यालये

| | |
|---|---|
| मुख्यालय | ट्रेड वर्ल्ड, ए विंग, 4 था मजला, कमला मिल्स कंपाऊंड, लोअर परेल, मुंबई - 400013<br>फोन - (022) 24994200 |
| | |
| शाखा कार्यालये | |
| | |
| अहमदाबाद | युनिट 402, ४था मजला, हेरिटेज हॉरीझॉन, ऑफ सी. जी. रोड , नवरंगपुरा, अहमदाबाद - 380009<br>फोन - (079) 26461375 |
| | |
| बेंगळूरू | ऑफिस नं. 106,<br>डीबीएस हाऊस 26,<br>कनिंघम रोड,<br>बेंगळूरू - 560052<br>फोन - (080) 40407106 |
| | |
| चेन्नई | 6 ए, 6 वा मजला, कैंसीस टावर्स, |

| | |
|---|---|
| | #1 रामकृष्ण स्ट्रीट,<br>नॉर्थ उस्मान रोड,<br>टी. नगर,<br>चेन्नई - 600017<br>फोन - (044) 2814 3917 /11 |
| | |
| हैदराबाद | ऑफिस नं. 123,<br>हैदराबाद रेगस मिड-टाउन, 1ला मजला, मिड टाउन प्लाझा,<br>रोड नं. 1, बंजारा हिल्स,<br>हैदराबाद - 500033<br>फोन - (040) 44334178 |
| | |
| कोची | सूट नं. एस - 105, मोनलॅश बिझनेस सेंटर, 4था मजला,<br>क्रीसेन्स टॉवर,<br>एनएच 47, चंगमपुझ्हा नगर पोस्ट,<br>कोची - 682033<br>फोन - (0484) 2933075 |
| | |
| कोलकता | युनिट 2ई, 2रा मजला, द मिलेनियम, 235/2ए, ए.जे.सी. बोस रोड, कोलकता - 700020<br>फोन - (033) 22904243<br>(033) 22904246 |
| | |
| नवी दिल्ली | युनिट नं. 601, 603, 604, 6वा मजला, टावर - ए, नौरंग हाऊस,<br>कस्तुरबा गांधी मार्ग, कॉन्नौट प्लेस,<br>नवी दिल्ली - 110001<br>फोन - (011) 23353814 |

| | |
|---|---|
| | (011) 23353815 |

## उपयुक्त लिंक्स

http://www.ncfe.org.in/

https://investor.sebi.gov.in/

https://www.irdai.gov.in/

https://www.nism.ac.in/

https://www.pfrda.org.in/index1.cshtml?lsid=854

https://www.rbi.org.in/FinancialEducation/Home.aspx

www.nsdl.co.in

## वापरलेले संक्षेप

| | |
|---|---|
| बीएसडीए | बेसिक सर्विसेस डिमॅट अकाऊंट |
| बीएसई | बीएसई लिमिटेड (अगोदर बॉम्बे स्टॉक एक्स्चेंज लिमिटेड असे परिचित होते) |
| सीएएस | कन्सॉलिडेटेड अकाऊंट स्टेटमेंट |
| सीकेवायसी | सेंट्रल केवायसी |
| सीआरएफ | कन्वर्शन रिक्वेस्ट फॉर्म |
| डीआयएस | डिलिव्हरी इंस्ट्रक्शन स्लिप |
| डीपी | डिपॉझिटरी पार्टिसिपंट |
| डीआरएफ | डिमटेरियलायझेशन रिक्वेस्ट फॉर्म |
| जी-सेक | गव्हर्नमेंट सेक्युरिटीज |
| आयडियाज | इंटरनेट बेस्ड डिमॅट अकाऊंट स्टेटमेंट |
| आयईपीएफ | इन्व्हेस्टर एज्युकेशन अँड प्रोटेक्शन फंड |
| आयएफएससी | इंडियन फायनांशियल सिस्टीम कोड |
| आयपीओ | इनिशियल पब्लिक ऑफर |
| आयआरडीएआय | इन्शुरन्स रेग्युलेटरी अँड डेव्हलपमेंट ऑथोरिटी ऑफ इंडिया लिमिटेड |
| आयएसआयएन | इंटरनॅशनल सेक्युरिटीज आयडटिफिकेशन नंबर |
| केआरए | केवायसी रजिस्ट्रेशन एजन्सी |
| केवायसी | नॉ योर कस्टमर |
| एलएएस | लोन अगेन्स्ट शेअर्स |
| एनएडी | नॅशनल अकॅडमिक डिपॉझिटरी |
| एनडीएमएल | एनएसडीएल डेटाबेस मॅनेजमेंट लिमिटेड |
| एनएफओ | न्यू फंड ऑफर |
| एनआयआर | नॅशनल इंश्युरन्स रिपॉझिटरी |
| एनआरआय | नॉन रेसिडंट इंडियन |
| एनएसडीएल | नॅशनल सेक्युरिटीज रिपॉझिटरी लिमिटेड |
| एनएसई | नॅशनल स्टॉक एक्स्चेंज ऑफ इंडिया लिमिटेड |
| एनएसआर | नॅशनल स्किल्स रजिस्ट्री |
| पीएएन | पर्मनंट अकाऊंट नंबर |
| पीओए | पॉवर ऑफ ॲटर्नी |
| आरआरएफ | रिमटेरियलायझेशन रिक्वेस्ट फॉर्म |
| आरटीए | रजिस्ट्रार टू ॲन इश्यू अँड शेअर ट्रान्सफर एजंट |
| सेबी | सेक्युरिटीज अँड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया |
| एसजीबी | सॉव्हरिन गोल्ड बॉंड्स |

| | |
|---|---|
| एसआयपी | सिस्टमेटिक इन्व्हेस्टमेंट प्लान |
| एसएलबीएस | सेक्युरिटीज लेंडिंग अँड बॉरोइंग स्कीम |
| एसएमएस | शॉर्ट मेसेजिंग सर्विस |
| एसओए | स्टेटमेंट ऑफ अकाऊंट |

हे प्रकाशन एनएसडीएल इन्व्हेस्टर प्रोटेक्शन फंड ट्रस्टचा एक उपक्रम आहे.

अस्वीकरण - ही पुस्तिका एनएसडीएलद्वारा गुंतवणूकदार समुदायाच्या सर्वसाधारण हितार्थ बनविली आहे. या पुस्तिकेत दिलेली माहिती अनेक स्रोतांकडून गोळा केलेली आहे आणि याचा अर्थ गुंतवणुकीचे निर्णय घेण्यासाठी आणि / किंवा कायदेशीर कारवाई करण्यासाठी सुरवात करणे असा नाही. यात सर्व लागू नियम आणि नियमने समाविष्ट करण्याचा हेतू नाही. वाचकांना विनंती केली जाते की या पुस्तिकेला केवळ सर्वसाधारण शैक्षणिक हेतूसाठी समजले जावे. एनएसडीएल आणि त्याच्या सेवांवरील अधिक माहिती www.nsdl.co.in वर उपलब्ध आहे.

या पुस्तिकेत तुम्हाला कोणत्याही त्रुटी किंवा चूक आढळून आल्यास, कृपया info@nsdl.co.in येथे लिहून आमच्या ध्यानी आणून द्या.

आवृत्ती - ऑगस्ट 2019